# फाईव्ह स्टार न्यूज

वर्ष 11 वे | फेब्रुवारी 2024 | अंक 122 वा

MAKH

















रजि. नं. महा/23991/कोल्हापूर, एफ्/21258/कोल्हापूर

MAKH
स्था.: 04-08-2007

## मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल-हातकणंगले (मॅक)

प्लॉट नं. पी-4, ए एम्-28, मॅक चौक, पंचतारांकीत औद्योगिक वसाहत, कागल-हातकणंगले, जि. कोल्हापूर-416 236.
ऑफिस फोन: (0231) 2305373. मोबा.: 8530445373, 9561445374
E-mail : presidentmakh@gmail.com | Website : **www.makhkolhapur.org**

## We Supply



### Plumbing Material
uPVC & PVC, HDEP, Large Dia GI & MS & SS, cPVC Pipes & Fitting etc.



### Safety Item
Safety Belts, Jackets, Shoes, Goggles, Ear Plugs/ Mufflers, Masks, various type of gloves, Safety Nets etc.

### Standard Star Couplings / Spider Couplings
Love Joy Coupling, Star Coupling



Rod, Cable, Holder, Gas Cutter Hose, Welding Hand ..., Cylinder key, Pressure Regulator, Welding Torch & accessories, CO2 Mig Welding Wire, CO2 Contact Tip, Tip Holder, Diffuser, CO2 Liner, Conical Nozzle.





### Fasteners
Regular/ Hardened (TVS Unbrako) Nut Bolts, Anchor Fasteners, Foundation Bolts Allen Bolts, Roofing Bolts/ Screws, Al Rivets.



### Industrial Lubricants
Hydraulic Oil, Cutting Oil, Break Oil, Food Grade Oil and various types of Grease etc.



# KOLHAPUR TRADING PVT. LTD.

Single Source Destination For Your Multiple Requirements

Gat No. 356/2 K Five Star MIDC Road, Kagal, Kolhapur 416216
Head Office : 0231-2620315, 2625394 Fax 0231-2620019
Shop : 9921942552, 9921925885



### Packing Material
Strap Hand Tensioner & sealer, Plastic Sutli, Packing Clips, BOPP Tape, Water Gummed Tape,Stretch Film, Packing Patti (Pet/PP), & Bubble Sheet etc..



### Pneumatic Fitting
Air Blow Guns, PU Pneumatic Pipe And Its Fittings , Pneumatic Control Valves.

### Paints



### Electric Item
Wires, Cables, Switches, Halogen fitting & Tubes, Aluminium Lugs, Shock Proof Hand gloves, GI Cable Tray, Spark Free Light Fittings etc.





### Cleaning Items
Naphthalene Balls,Liquid Soap, Floor Cleaner, Dust Bin, Dust Control Mop, Floor Wiper, Hand Broom, Broom Pipe, Washing Brush, Supli.

### Hand Tools
The complete hand tool shop with a quality range of tools. Make :- Taparia & Jhalani



**And Further...** Samruddhi Unbreakable Plastic Utensils, Roofing Sheet, Electric Hand Tools, Construction Chemical Accessories, Cement , Adhesive Items , Abrasive Item, Stationery Items, Industrial Lubricants

Copyright

E-mail Id :- ktpl.kagal@ksmgroup.co.in



॥ श्री जोतिर्लिंग प्रसन्न ॥
adh
ADhi Engineering
A Name You Can Trust...
Mr. Dhiraj B. Patil
www.adhiengineering.in
Mr. Amol D. Khambe
8087341176
9595525363
Box Type Single Girder Eot Crane
www.adhiengineering.in
www.adhiengineering.in
Double Girder Overhead Cranes
JIB Crane
Scissor Lift Table
Single Girder E.O.T. Crane
Wire Rope Hoist
Modular Wire Rope Hoist
DSL Busbar System
Air Compressor PPR FR Blue Pipeline & Fittings
Reciprocating Air Compressor
Screw Air Compressor
Refrigerated Air Dryer
Chain Hoist
Manual Stacker
Semi Electric Stacker
Fully Electric Stacker
Electric Paper Reel Stacker
Manual Drum Tilter & Lifter
Hydraulic Beam Shifting Trolley
Pallet Truck
Dock Levellers
Single Mast Goods Lift
All Types of Elevator
Aluminium Air Pipe Line
Weight Crane Scale
Webbing Sling
Radio Remote
Push Button Pendant
Filter Element & Filter
LLDPE TUBE
Zero Air Loss Drain Valves
Tec44 Auto Drain Valves
Auto Drain Valves
Compressed Air Fittings
Magnetic Lifter
Mini Electric Hoist
Helical Gear Motor
Hydraulic Puller
Engine Crane
Construction Mini Crane
Geared Trolley
Chain Pulley Block
Electric Winch
Pneumatic-Grease Pump
Hydraulic Service Lift
Vehicle Washer
High-Bay Lights
Street Lights
LED Flood Lights
LED Tube Light
Racking System
Mr. Amol D. Khambe
9595525363
ADhi Engineering
A Name You Can Trust...
Mr. Dhiraj B. Patil
8087341176
Kiran Bungalow, M. G. Patil Chowk, Patil Galli, Unchgaon, Kolhapur-416005. Maharashtra.
email : adhiengineering8485@gmail.com, info.adhiengineering@gmail.com
Website : www.adhiengineering.in
GST No. 27ABEFA3201G1Z1

# PRECISE PEB PVT. LTD.

- Plot No. D 112/3, Kagal-Hat. five star MIDC, Kolhapur, Maharashtra-416216
- Mob. 9921063063 / 7083729009
- Email : info@precisepeb.com
- Website : www.precisepeb.com
- CIN - U45309PN2019PTC184729

**PRECISE PEB** is a full service metal building construction company with the aim to provide quality steel buildings while delivering prompt personalized and professional service. If you can imagine a project, we can build the steel structure to fit your needs. From Farm Buildings to Retail Buildings, Warehouses, Garages / Workshops and specialized applications, **PRECISE PEB** has the expertise and experience to complete your project on time and on budget with civil & building.

## WE PROVIDE - END TO END


- Concept & Architectural Solution in PEB
- Site development / Design Build services (Civil works)
- Supply & installation of steel building and related work.
- Overall responsibility and interface lionising.
- Work shop facility Pullthrow & Palzma cutting machine

## PEB ADVANTAGE

- Larger span
- Faster construction & Completion
- Cost efficiency
- Economical
- Control Quality
- Strength & Stability

















Sanjay D. Pendse 9422044216 | Subodh S. Pendse 9922960961

KP SINCE 1988

# KAYPEE MACHINES PVT. LTD.

A-249, Five Star MIDC, Kagal,
Kolhapur - 416 236

**9922960955, 0231-2305129**

kaypeemachineskop@gmail.com

**Manufacturers of-**
- **Engineering & Auto Component Precision Machining.**
- **Patterns & Dies, Jigs, Fixtures, SPM's.**
- **Spares for Various Machines & Equipments.**
- **Power Chucks Reconditioning.**
- **Machine Maintenance Services.**

Near Suresh Machinery,
Shivaji Udyamnagar, Kolhapur-416 008.

**9922960956, 9922960950**

sales.kaypeemachines@gmail.com

**Dealers in -**
- **Machines & Equipments.**
- **Material Handling Equipments.**
- **Laser Cutting Machines.**
- **Plasma Cutting Machines.**
- **Inspection Equipments.**
- **Machine Tool Accessories.**

DMW

# DYNAMIC METAL WORKS

**Manufacturer's of**

**1. ALUMINUM CASTING, HEAT TREATMENT & SHOT BLASTING**

**2. S G IRON & CI CASTINGS**

**HARISHCHANDRA S. DHOTRE**

**President :**

Manufacturers Assocation Kagal, Hatkangale, Kolhapur.
Yog Viday Dham, kolahpur.
Akhil Gurav Samaj Sanghtna, Kolahpur Dist.

**HARSHWARDHAN H. DHOTRE**
Mob.8600151546

Factory : Plot No. B-41, Five Star MIDC, Kagal,
Dist. Kolhapur-416 236.
Ph. No. 0231-2305173
Mobile : 9422412903
Email : dynamicmetal1@hotmail.com
Website : www.dynamicmetalworks.in




DARSHAN
COLOUR COATED SHEETS

# DARSHAN ENTERPRISE


Mfg. PPGI Colour Coated Sheets



## Roofing Sheets



## Linear Sheets


Bending Sheets


Doom Bending


Self Tapping Screw


Corner Flash


Redges

Light Blue

Off White


Brick Red

Mist Green

Reliance Green

D-42, Behind Mantri Metallics,5 Star MIDC, Hupari Road, Kagal, Tal. Hatkanangale, Kolhapur - 416236

Contact - 9922627774



Industrial Automation
PLC Based Electrical Panels
MCC and Distribution Panles
Industrial Furnace Panels
APFC Panels
Electrical Switchgears
Lighting and Time bell Panels
Shree
|| Sadgurukrupa||
Automation
ISO 9001-2015
Industrial Automation & Electrial panels manufacturing company
Address : G-66, Kagal Five Star MIDC, Kagal, Kolhapur. Mob. 8308949500
Email : suresh.sadgurukrupaautomation@gmail.com





SHREE
SAMARTH KRUPA
E MART
आता कोल्हापूरला जायची गरज नाही
इलेक्ट्रीकल
इलेक्टॉनिक्स्
ॲटोमेशन प्रॉडक्ट
सर्व ई प्रॉडक्टस् आपल्या कागल पंचतारांकित एमआयडीसीत.
Plot No. P4, Makh Association Building, Makh Chowk, Kagal - Hatkanangale MIDC.
8308949500, 9373762980
CONNECT US FOR YOUR
POWERFUL BUSINESS



FUSION AQUA
FUSION AQUA
MANUFACTURER OF HDPE, PVC &
HYDROPHONICS PIPES & FITTINGS
Plot No. A-233, Kagal-Hatakangale Road,
Five Star MIDC, Kagal, Kolhapur-416 236.
+91 9960376869, +91 9960399494,
+91 9960392424, Off.:+91 9309977494
contact@fusionaqua.in
www.fusionaqua.in
ISO 9001-2015
Certified Mfg.Company
MJP Approved
IS:4984/3016
ISI
CM/L 7500589947
MORE
STRENTH
HIGHEST
DURABILITY
HDPE
PIPES
MDPE
PIPES
FITTINGS
HDPE PIPES OF DIAMETER
20MM TO 200MM
MANTRA : 9822518735, 7385304534

फाईव्ह स्टार न्यूज
फेब्रुवारी २०२४



## संपादकीय

### प्रजासत्ताक दिन

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 31 डिसेंबर 1929 रोजी लाहोरजवळ रावी नदीच्या काठी तिरंगा फडकावून पूर्ण स्वराज्याची घोषणा केली होती. 29 ऑगस्ट 1947 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसुदा समिती स्थापन केली होती. या समितीने संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे 4 नोव्हेंबर 1947 रोजी सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव 166 दिवसासाठी खुला ठेवला आणि मगच समितीने भारतीय राज्यघटनेचा स्विकार केला. बरीच चर्चा आणि त्यानुसार दुरुस्त्या करुन, 308 सदस्यांनी 24 जानेवारीस त्यावर स्वाक्षऱ्या केल्या. 26 जानेवारीस भारताच्या या संविधानाच्या निमित्ताने 'प्रजासत्ताक दिन' साजरा करण्यात येऊ लागला. आज 74 वा प्रजासत्ताक दिन आणि पुढच्या वर्षी 75 वा देशाचा अमृत काळ सुरु झालेला असताना त्याचे औचित्य आणखी वाढते, ते संविधानाने घालून दिलेल्या उद्दिष्टांमुळे. पहिल्या 'प्रजासत्ताक दिन' सोहळ्याला भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते तिरंगा फडकवण्यात आला, तेव्हा तोफांच्या आवाजाने परिसर निनादला, तो सोहळा दिल्लीतील पुराना किल्यासमोरच्या जुन्या स्टेडियमवर पार पडला होता. देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि गव्हर्नर सी गोपालाचारी त्यावेळी उपस्थित होते. शेवटचे व्हाइसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन यांच्याकडून त्यांनी सूत्रे स्वीकारली होती. प्रजासत्ताकदिनी भारत लोकशाही, सार्वभौम, गणराज्य बनला. संविधान दिन आणि प्रजासत्ताक दिनाचे महत्व विशेष यासाठी की, हा देश नियम, कायदेकानून व घटनेनुसार चालणार, याची ती ग्वाही आहे. कोणताही सत्ताधारी आला, तरी त्याला राज्यघटना हीच शिरसावंद्य मानावी लागते. त्याचप्रमाणे ही सत्ता प्रजेची आहे व आपण केवळ तिचे सेवक आहोत, हे भान त्याला ठेवावे लागते.

प्रजासत्ताकात खरी सत्ता प्रजेकडेच असली तरी देखील आज महाराष्ट्रातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकाच झालेल्या नाहीत आणि तेथे प्रशासकांचा कारभार आहे. प्रजेने हक्कांबरोबर आपल्या कर्तव्यांचीही जाण ठेवली पाहिजे. कर न भरणे, सिग्नल तोडणे, अस्वच्छता करणे, सण-सोहळ्यांचा निमित्ताने मोठ्या आवाजात गाणी लावून इतराना त्रास देणे या गोष्टी टाळायला हव्यात. केवळ देशभक्तीची गाणी लावून अथवा बॅनर झळकावून राष्ट्रप्रेम सिद्ध होत नाही. काहीही न बोलता देखील कर्तव्याचे पालन करून प्रजासत्ताकावरील आपले प्रेम सिद्ध करता येऊ शकते. स्वातंत्र्य आणि संविधानाने दिलेल्या हक्क, अधिकाराबरोबर कर्तव्याचे भान ठेवणे, देशाचा निकोप, निरंतर विकासासाठी आणि भ्रष्टाचारमुक्त सरकार बनविण्यासाठी वापरणे हेच भान अधिक व्यापक व्हावे, हीच प्रजासत्ताक दिनी अपेक्षा.

संस्थापक संपादक : श्री. अशोक दुधाणे
सहसंपादक : श्री. संजय पेंडसे
अध्यक्ष : श्री. हरिश्चंद्र धोत्रे
उपाध्यक्ष : श्री. मोहन कुशिरे
सचिव : श्री. विठ्ठल पाटील
खजानिस : श्री. सुरेश क्षीरसागर

**फाईव्ह स्टार न्यूज मासिक जाहिरात दरपत्रक**

| जाहिरातीचे प्रकार | मासिक दर | वार्षिक दर |
|---|---|---|
| पूर्ण पान-रंगीत (कव्हर पेज मागील) | - | २५,०००/- |
| पूर्ण पान-रंगीत (आतील पान) | - | २०,०००/- |
| अर्धे पान-रंगीत (आतील पान) | - | १०,०००/- |
| पूर्ण पान (कृष्णधवल) | ₹ १,४००/- | ₹ १६,०००/- |
| अर्धे पान (कृष्णधवल) | ₹ ८००/- | ₹ ९,५००/- |

**जाहिरातीसाठी संपर्क : 8530445373, 9561445374**

मुद्रक : मॅक पंचतारांकीत एम्. आय.डी.सी. यांनी 'फाईव्ह स्टार न्यूज' या नावाने 'मंत्र', राजारामपुरी १३ वी गल्ली, कोल्हापूर येथे छापून मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, फाईव्ह स्टार एम्. आय.डी.सी., कागल-हातकणंगले येथून प्रकाशित केले.

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| क्षणचित्रे | 2 |
| स्वागतार्ह पाऊल | 7 |
| पेटीएम प्रकरणाचा धडा | 9 |
| सुधारणांची प्रतीक्षा | 12 |
| एव्हरग्रँडची दिवाळखोरी आणि चीन | 14 |
| बहुरुपी अशोकमामा | 17 |
| संकल्प विकसित भारताचा | 19 |
| जननायकाचा सन्मान | 21 |
| समतोल अर्थसंकल्प | 23 |

# 74 वा भारतीय प्रजासत्ताक दिन मॅकच्या प्रांगणात संपन्न



74 वा भारतीय प्रजासत्ताक दिन मा. श्री. किरण पाटीलसाहेब (चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर, घाटगे पाटील इंडस्ट्रीज लि.) यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून संपन्न झाला. या प्रसंगी मॅकचे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, उपाध्यक्ष मोहन कुशिरे, ऑन. सेक्रेटरी-विठ्ठल पाटील, ऑन. ट्रेझरर सुरेश क्षीरसागर, सोबत मॅकचे इतर पदाधिकारी व अग्निशमन अधिकारी व मान्यवर उद्योजक.

## मॅकच्या वतीने स्वागतपर सत्कार संपन्न



मॅकच्या वतीने  मा. श्री. किरण पाटीलसाहेब यांचा स्वागतपर सत्कार करताना
मॅकचे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, उपाध्यक्ष मोहन कुशिरे, ऑन. सेक्रेटरी-विठ्ठल पाटील, ऑन. ट्रेझरर सुरेश क्षीरसागर,
सोबत मॅकचे इतर पदाधिकारी व मान्यवर उद्योजक.

## 'फाईव्ह स्टार न्यूज़' नूतन आवृत्ती प्रकाशन सोहळा संपन्न



'फाईव्ह स्टार न्यूज़' नूतन आवृत्ती प्रकाशन सोहळा मा. श्री. किरण पाटीलसाहेब यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.
या प्रसंगी मॅकचे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, उपाध्यक्ष मोहन कुशिरे, 'फाईव्ह स्टार न्यूज़'चे संपादक व मॅकचे संचालक अशोक दुधाणे, ऑन. सेक्रेटरी-विठ्ठल पाटील, ऑन. ट्रेझरर सुरेश क्षीरसागर,सहसंपादक संजय पेंडसे, सोबत मॅकचे इतर पदाधिकारी व मान्यवर.

# 'तंत्रज्ञानाचा आपल्या औद्योगिक उत्पादनावर होणारा परिणाम व बदल' या विषयावर सेमिनार संपन्न



मॅकच्या वतीने मा. श्री. भूषण केळकर यांचा स्वागतपर सत्कार करताना मॅकचे पदाधिकारी समवेत मान्यवर उद्योजक.



'तंत्रज्ञानाचा आपल्या औद्योगिक उत्पादनावर होणारा परिणाम व बदल' या विषयावर मा. श्री. भूषण केळकर,पुणे हे सविस्तर माहिती देताना सोबत मॅकचे पदाधिकारी व मान्यवर उद्योजक.

'स्टाईव्ह प्रोजेक्ट'च्या धर्तीवर स्मॅक आयटीआय, शिरोली येथे सुरु असलेल्या मॅक स्टाईव्ह प्रशिक्षणार्थी विद्यार्थी-विद्यार्थिनी प्रशिक्षण वर्गास मॅकचे पदाधिकारी यांची सदिच्छा भेट



# क्षणचित्रे

डॉ. रघुनाथ ए. माशेलकर,
पद्म विभूषण,पद्म भूषण, पद्मश्री,
महाराष्ट्र भूषण. संस्थापक चेअरमन- CSIR
यांचा मॅकच्या वतीने सत्कार करताना
मॅकचे पदाधिकारी






मा. अमोल येडगे,
जिल्हाधिकारी, कोल्हापूर
यांचा स्वागतपर सत्कार करताना
मॅकचे पदाधिकारी

मा. अमोल येडगे, जिल्हाधिकारी,
कोल्हापूर यांच्या समोर
पंचतारांकीत औद्योगिक क्षेत्रातील
उद्योजकांच्या विविध समस्या मांडताना
मॅकचे पदाधिकारी





उद्योजकांना विद्युत पुरवठा उपलब्ध व्हावा
या हेतूने पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात
मॅक च्या पाठपुराव्यामुळे 10 MVA चा
ट्रान्सफॉरमर कार्यान्वित

# क्षणचित्रे



चेंबर चषक क्रिकेट स्पर्धा-2024 मध्ये मॅक चा सहभाग जिमखाना ग्राउंड, कोल्हापूर



मॅक च्या वतीने पट्टणकोडोली ग्रामपंचायत येथे स्ट्राईव्ह प्रोजेक्ट बाबत माहिती देताना



कोगनोळी हायस्कूल येथे स्ट्राईव्ह प्रोजेक्ट बाबत माहिती देताना मॅक कमिटी



मॅक च्या वतीने कळंबा आयटीआय, कोल्हापूर येथे विद्यार्थी-विद्यार्थिनींना स्ट्राईव्ह प्रोजेक्ट बाबत माहिती देताना



कव्हर स्टोरी

# स्वागतार्ह पाऊल

प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर

***महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील अजिंक्य अशा ११ गडांची जागतिक वारसा स्थळांसाठी शिफारस केली आहे. ही बाब महाराष्ट्राच्या समृद्ध, सांस्कृतिक वारसा अधिक सुसंपन्न करणारी आहे. त्याहीपलीकडे महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्रामध्ये नवीन क्रांती घडवून आणणारी आहे. जागतिक वारसा म्हणून महाराष्ट्रातील गडकोटांची नोंद झाल्यास महाराष्ट्रातील पर्यटनाचा परतावा गतीने वाढणार आहे. देशी आणि विदेशी पर्यटकांची संख्या वाढल्यामुळे महाराष्ट्रात पर्यटन क्षेत्रात नव्या रोजगार संधीची उपलब्धी होणार आहे.***

जगभरातील वैशिष्ट्यपूर्ण अशा वारसा स्थळांना 'युनेस्को'च्या वतीने जागतिक वारसा स्थळे म्हणून घोषित केले जाते. अशी वारसा स्थळेभारतामध्ये ४२ असून जगामध्ये त्यांची संख्या ११९९ इतकी आहे. वारसा स्थळांच्या संख्येमध्ये जगात भारतापेक्षाही इटाली, चीन इत्यादी राष्ट्रे पुढे आहेत. खरे पाहता समृद्धसंपन्न असा सास्कृंतिक वारसा असूनही गेल्या ७५ वर्षांत भारताने या सांस्कृतिक स्थळांच्या बाबतीत फारसे स्वारस्य दाखवलेले नाही. त्यामुळे कितीतरी संपन्न, समृद्ध सांस्कृतिक वारसास्थळे अजूनही अंधारातच चाचपडत आहेत. याबाबतीत १९८० च्या दशकात भारतीय पुरात्वाच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्रातील अंजिठा, वेरूळ यासारख्या जगद्‌विख्यात लेणींचा जागतिक वारसा स्थळात समावेश करण्यात आला. आता विद्यमान राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील अजिंक्य अशा ११ गडांची जागतिक वारसा स्थळांसाठी शिफारस केली आहे. ही बाब महाराष्ट्राच्या समृद्ध, सांस्कृतिक वारसा अधिक सुसंपन्न करणारी आहे. त्याहीपलीकडे महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्रामध्ये नवीन क्रांती घडवून आणणारी आहे. जागतिक वारसा म्हणून महाराष्ट्रातील गडकोटांची नोंद झाल्यास महाराष्ट्रातील पर्यटनाचा परतावा गतीने वाढणार आहे. देशी आणि विदेशी पर्यटकांची संख्या वाढल्यामुळे महाराष्ट्रात पर्यटन क्षेत्रात नव्या रोजगार संधीची उपलब्धी होणार आहे.

सध्या नव्या जगातून आणि युरोपातून भारताकडे येणारे पर्यटक हे प्रामुख्याने दिल्ली, आग्रा, जयपूर या गोल्डन ट्रँगलमध्येच अडकलेले दिसतात. त्याचे कारण असे की इंग्लिश पुरातत्वज्ज्ञ कर्नल जेम्स टॉड यांनी 'ॲनल्स अँड अँटीक्युटीज ऑफ राजस्थान' नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये त्यांनी राजस्थानातील पर्यटनाचे रसभरीत वर्णन केले. हे रोमांचक वर्णन युरोपात घरोघरी वाचले जावू लागली. परिणामी भारत बघायला येणाऱ्या पर्यटकांना आजही पहिले आकर्षण असते ते राजस्थानचे. राजस्थानातील मोठे मोठे किल्ले, युद्धस्थळे, आलिशान राजवाडे पाहून त्यांचे डोळे दीपून जातात. त्यानंतर ते ताजमहल पाहतात. दिल्लीमधील काही जुन्या इमारती पाहतात आणि परतीच्या प्रवासाला लागतात. देशात येणाऱ्या विदेशी पर्यटकांपैकी ५ ते ७ टक्के पर्यटक फक्त अंजिठा किंवा वेरुळ पाळण्यासाठी दक्षिणेकडे म्हणजे महाराष्ट्राच्या भूमीत येतात. पूर्वी दिल्ली, जयपूर, उदयपूर आणि औरंगाबाद ही जी विमानसेवा होती ती ३० वर्षांपासून खंडीत करण्यात आली. त्यामुळे पर्यटकांना अंजेठा–वेरुळचे वैभव काही दिसत नाही.

महाराष्ट्राच्या गडकोटाकडेही पर्यटकांचे दुर्लक्ष होते. व्हिएतनामचे मुक्तीदाता स्वातंत्र्ययोद्धे होचीमीन यांनी भारतात आल्यानंतर मला छत्रपती शिवाजी महाराजांचा रायगड पाहवयाचा आहे अशी विनंती केली होती तेव्हा त्यांच्यासाठी स्वतंत्र विमानाने रायगड पाहण्यासाठी संधी उपलब्ध करून देण्यात आली. तेथील मुठभर माती घेऊन ते आपल्या देशात गेले आणि त्यांनी आपल्या देशातील लोकांना गनिमी युद्ध लढण्यासाठी छत्रपती शिवाजी महारांजाकडून प्रेरणा घेतली असे अभिमानाने सांगितले. छत्रपती शिवाजीराजे हे युगपुरुष होते. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता आणि सामाजिक न्यायावर आधारलेले स्वराज्य स्थापन करणाऱ्या छत्रपतींचे ३०० हून अधिक किल्ल्यांपैकी २०० किल्ले स्वत: महाराजांनी उभारलेले आहेत. पेशवाई पडल्यानंतर इंग्रजांनी सत्ता हातात घेताना या गडकोटांना आगी लावून भेसूर करून टाकले. त्यानंतर महाराष्ट्रातील गडकोटांच्या संरक्षण, संवर्धन या कामाकडे दुर्लक्ष झाले. गेल्या काही वर्षांत पुन्हाएकदा गडसंवर्धनाच्या प्रक्रियेला चालना दिली जाऊ लागली; पण तरी देखील पुरातत्व खात्याकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टीकोन आणि अपुरी वित्तीय तरतूद ही कायम राहिली. या पार्श्वभूमीवर शिवकाळातील ११ गडकोटांचे संवर्धन आणि विश्व वारसा स्थळांमध्ये त्यांचा समावेश होण्यासाठी केलेले प्रयत्न स्वागतार्ह आणि स्पृहणीय म्हणावे लागतील.

या गडकोटांच्या व्यवस्थापनाचा, त्यांच्या नियोजनाचा, त्यातीलपद्धशीर नियंत्रण, संतुलन आणि व्यवस्थापन प्रणालीचा अभ्यास केला असता असे दिसते की मध्ययुगीन काळातही अत्यंत प्रगत अशी संरक्षण व्यवस्था छत्रपती शिवाजी महाराजांनी शिवकालामध्ये विकसित केली होती. त्यामुळे मध्य आशियातून भारतावर चालून आलेल्या मुघलांना परास्त करून हिंदवी स्वराज्याची ध्वजा गगनामध्ये उंच उंच फडकवण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त झाले. महाराष्ट्रातील गडकोटांच्या वैभवांचा इतिहास विदेशी पर्यटक, अभ्यासक, संशोधक यांच्यासमोर आणण्यासाठी काही गोष्टी प्राधान्याने करावयास हव्यात.

पहिले म्हणजे, गडकोटांच्या सुरक्षा आणि वैभवाच्या सुवर्ण कडा पुन्हा प्रकाशमान होण्यासाठी त्यांच्या संवर्धनावर विशेष लक्ष केंद्रीत करावे लागेल. मुख्य शहरापासून गडकोटापर्यंत उत्तम दर्जाच्या रस्त्यांचे जाळे तयार करावे लागेल. रेल्वे वाहतूक, हवाई वाहतूक आणि रस्ते वाहतूक यामध्ये ज्या समन्वयाची गरज असते तशा समन्वयाची व्यवस्था महाराष्ट्रात नसल्यामुळे रायगडावर पोहोचणे किंवा प्रतापगडावर पोहोचणे, शिवनेरीवर पोहोचणे राजगडावर पोहोचणे याबाबी म्हणजे पर्यटकांना साहस वाटू लागतात. खरे तर या सर्व गडकोटांना एकमेकांशी जोडून त्यांचे पर्यटन शास्त्राप्रमाणे सर्कीट तयार केल्यास तेथे पोहोचण्यासाठी अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून देता येतील. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे गडकोटांचे पावित्र्य राखण्यासाठी, तेथील जिवंत इतिहास बोलका करण्यासाठी कल्चलर लुकआऊट नोटिस म्हणजे सांस्कृतिक इतिहासाचे पट लोकभाषेमध्ये उलगडले पाहिजेत. इंग्रजी तसेच मराठी भाषेमध्ये या गडकोटांचा थोडक्यात आणि प्रभावी असा इतिहास प्रकट केला पाहिजे. अलिकडे काही सीडीज् आणि व्हीसीडीजही काही गडकोटांबद्दल उपलब्ध आहेत. पण ते प्रकाशाच्या वाटेपासून दूरच आहेत. गडकोटांच्या बाबतीत समग्र पट उलगडणाऱ्या पुस्तकांची यादी करावयाची झाल्यास तीही फारशी नाही. आपणास गडकोटाच्या इतिहासावर नवा प्रकाश टाकण्यासाठी नव्या साहित्याची आवश्यकता आहे. विशेषत: असे साहित्य आंतरराष्ट्रीय पर्यटकांना खेचण्यासाठी म्हणून अव्वल दर्जाच्या इंग्रजीमध्ये आणि तेवढेच गतीमान व आक्रमक पद्धतीने लिहिले गेले पाहिजे. कर्नल टॉड यांच्या राजस्थानच्या पुस्तकाचा आदर्श ठेवून महाराष्ट्रातील गडकोटांचा इतिहास लिहिला गेला तर युरोपातील पर्यटकांचे लोंढे महाराष्ट्राकडे वळवता येऊ शकतील. हे काम तसे अवघड वाटत असले तरी अशक्य आहे असे नाही. चौथी महत्त्वाची गोष्ट म्हणजे गडकोटांच्या सांस्कृतिक इतिहासातील मर्मभेदक अशा अंत:प्रवाहाचे नव्याने आकलन करणे. उदाहरणार्थ, राजगडावरील बाल किल्ल्याचे काय वैशिष्ट्य आहे, पन्हाळ गडावरील अत्यंत महत्त्वाच्या अशा युद्धक्षेत्राचे काय वैशिष्ट्य आहे, प्रतापगडावरील युद्धक्षेत्राचे स्थान कोणते आहे, शिवाजी महाराजांनी कशा पद्धतीने पन्हाळगड ओलांडून विशाळगडाकडे कूच केली या सर्व रोमहर्षक प्रसंगाचे अलीकडे चित्रपटातून प्रकटीकरण होत आहे. परंतु वॉर टुरिझम किंवा युद्ध पर्यटन यादृष्टीने विचार करता १६४६ साली छत्रपती शिवाजी महाराजांनी घेतलेला तोरणा, १७९५ मध्ये मराठ्यांनी निजामाला धुळ चारत जिंकलेली खर्ड्याची लढाई यांसारख्या थरारक कथा तितक्याच समर्पकपणाने इंग्रजी भाषेतून जागतिक स्तरावर प्रसारित व्हायला हव्यात १६४६ पासून १७९५ पर्यंत मराठ्यांनी केलेली पराक्रमांची शर्थ पाहता असे दिसते की मराठ्यांनी गडकोटांच्या रक्षणातून, संरक्षणातून एक जबरदस्त शक्ती मध्ययुगीन भारतामध्ये निर्माण केली होती. बी. एन आपटे यांच्या 'मराठा नाव्हल पॉवर' या ग्रंथामध्ये त्यांनी मराठ्यांनी चंद्रगुप्त मौर्यानंतर कशा पद्धतीने आरमार सज्ज केले होते यांचे अत्यंत समर्पक वर्णन आलेले आहे. युद्धनौकांची उभारणी त्यांची प्रगत रचना त्यांचा पोर्तुगीजांविरुद्ध मराठ्यांनी केलेला उपयोग पाहता मराठ्यांचे नौदल किती सामर्थ्यवान होते यांची प्रचिती येते. तात्पर्य असे की, शिवाजीराजांनी उभे केलेले गडकोट ही महाराष्ट्राची शान आहे. महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाचे खंदे साक्षीदार आहेत. आज परदेशांमध्ये जाऊन तेथील टोलेजंग इमारतींच्या स्थापत्यकलेचे गोडवे गाताना आपल्या मायभूमीमध्ये उभारण्यात आलेल्या शिवकालीन गडकिल्ल्यांचा विसर पडता कामा नये. उलटपक्षी जगभरातील भ्रमंतीतून या गडकिल्ल्यांच्या अभूतपूर्व स्थापत्यकलेची माहिती आपण प्रसृत केली पाहिजे. शासनाने जागतिक वारशांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रस्ताव पाठवून एक मोठे पाऊल टाकले आहे. पण तेवढ्यावर समाधान न मानता स्वराज्याचे नागरीक म्हणून तमाम मराठी जनांनी गडकोटांच्या संवर्धनासाठी, त्यांच्या प्रचार– प्रसारासाठी आपले योगदान दिले पाहिजे.




कव्हर स्टोरी

# पेटीएम प्रकरणाचा धडा

विश्वास उटगी
ज्येष्ठ बँकिंगतज्ज्ञ

***सात वर्षांपूर्वी करण्यात आलेल्या ऐतिहासिक नोटबंदीनंतर पेटीएम या फिनटेक कंपनीचा विस्तार खऱ्या अर्थाने सुरू झाला आणि पाहता पाहता देशभरातील ९ कोटी जण पेटीएमचे सभासद बनले. फेरीवाले, किरकोळ दुकानदार, व्यावसायिक, व्यापारी यांच्याबरोबरच ग्राहकांचीही पेटीएमसारख्या पेमेंट वॉलेटमुळे मोठी सोय झाली. यानंतर पेटीएमचे प्रवर्तक असणाऱ्या विजय शेखर शर्मा यांनी पेटीएम बँकेची स्थापना केली. तथापि, या बँकेच्या केवायसीमध्ये काही आक्षेपार्ह बाबी असल्याचे आरबीआयच्या निरीक्षणातून समोर आले आणि आता या पेमेंट बँकेचा परवाना रद्द करण्याचा इशारा देण्यात आला आहे. पेटीएमचा फुगा फुटणे हे नवअर्थकारणात तंत्रज्ञानावर आधारीत वित्तीय व्यवसाय करणाऱ्या फिनटेक कंपन्यांसाठी धोक्याची घंटा ठरणारे आहे.***

'पेटीएम करो' ही ट्यून भारतातल्या कोट्यवधी लोकांना परिचित झाली आहे. सत्ताधाऱ्यांच्या मदतीने या ट्यूनचा विस्तार झाला आहे, ही बाबही लपून राहिलेली नाही. कारण ८ नोव्हेंबर २०१६ रोजी देशाच्या पंतप्रधानांनी डिमॉनिटायजेशनची घोषणा केली. नोटबंदी ही या देशातील अत्यंत महत्त्वाची आणि दुर्दैवी घटना आहे. पण ९ आणि १० नोव्हेंबरच्या वृत्तपत्रांमध्ये देशाचे पंतप्रधान पेटीएमची जाहिरात करताना दिसले होते. विजय शेखर शर्मा यांनी स्थापन केलेल्या भारतातील एका फिनटेक कंपनीचे प्रमोशन स्वतः पंतप्रधान करत असल्याचे पाहून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. फिनटेक म्हणजे फायनान्स आणि टेक्नॉलॉजी यांचे मिश्रण. थोडक्यात तंत्रज्ञानाच्या व्यासपीठाचा आधार घेऊन वित्तीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या कंपन्यांना ढोबळमानाने फिनटेक कंपन्या असे म्हटले जाते. शर्मा यांचा पूर्वइतिहास पाहिल्यास ते रिझर्व्ह बँक ऑफ इंडियामध्ये अधिकारी होते. आरबीआयने २०१५ नंतर नवीन बँकिंग परवाना धोरण अमलात आणले. १९९५ मध्ये पहिल्यांदा डॉ. मनमोहनसिंगांनी अशा प्रकारची पॉलिसी आणली आणि त्यातून आयसीआयसीआय बँक, एचडीएफसी बँक, इंडसइंड बँकसारख्या १२ बँका आल्या. २००३ मध्ये येस बँक आणि कोटक महिंद्रा बँक आली. ३०० कोटी भांडवलाने यांची सुरूवात झाली आहे ! मोदी सरकारच्या काळात प्रामुख्याने दोन प्रकारच्या बँका दाखल झाल्या. एक म्हणजे पेमेंट बँक आणि दुसरा प्रकार म्हणजे बचत गटांच्या संघटनांचे बँकांत परिवर्तन होऊन बंधन बँक, आयडीएफसी बँक यांसारख्या बँका सुरू झाल्या. १९९५ च्या धोरणामध्ये बँक सुरू करण्यासाठी १०० कोटी भांडवल आवश्यक होते. २००३ मध्ये आलेल्या येस बँक, कोटक बँकयांसारख्या बँकांना ३०० कोटींचे भांडवल आवश्यक होते. २०१५ नंतर आलेल्या फिनटेक बँकांसाठी ५०० ते १००० कोटींचे भांडवल असलेच पाहिजे, असे

बंधन घालून आरबीआयने परवाने दिले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ही देशातील बँकिंग व्यवस्थेची नियंत्रक आणि नियामक आहे. त्यामुळे टेक्नॉलॉजीवर आधारीत फिनटेक बँका या नवीन स्वरुपाच्या बँका आहेत, याची आरबीआयला पूर्ण कल्पना आहे.

आज कागदावर छापलेल्या क्यूआरकोडचे देशाच्याकानाकोपऱ्यात वाटप केले जात आहे आणि ते स्कॅन करुन लाखो लोक आपली देयके अदा करत आहेत. भाजीवाले, छोटे दुकानदार, मोठे दुकानदार, फेरीवाले यांच्याकडेही क्युआर कोड आहे. इतकेच नव्हे तर फास्टटॅगसाठीही क्युआरकोड वापरण्यात येतो. या सर्व गोष्टी बँकिंग व्यवस्थेमध्ये फिनटेक कंपन्या करत असतात. बँकांमध्ये असणाऱ्या खात्यांशी या फिनटेक कंपन्या कनेक्ट होत असतात. या नवप्रणालीच्या माध्यमातून फार मोठे परिवर्तन या देशात घडून आले, ही वस्तुस्थिती आहे. पैसा एका खात्यातून दुसऱ्या खात्यात पाठवण्याची प्रक्रिया इतक्या गतिमानपणाने घडवून आणण्यास या फिनटेक कंपन्यांमुळे चालना मिळाली. पेटीएम, फोन पे, गुगलपे यांसारख्या काही प्रमुख कंपन्या या क्षेत्रात सध्या भारतात कार्यरत आहेत. पेटीएम ही यातील सर्वांत पहिली कंपनी. पेटीएमचे आजघडीला देशात सुमारे ९ कोटी सभासद आहेत. याच पेटीएमने नंतरच्या काळात पेटीएम बँकही स्थापन केली. अशा या पेटीएमची सध्या चर्चा होण्याचे कारण म्हणजे केंद्रीय अंतरीम अर्थसंकल्पाच्या काही तास आधी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नाईलाजाने का होईना पण पेटीएम बँकेवर बंदी घालावी लागली.


पेटीएम बँक आणि पेटीएम या दोन स्वतंत्र संस्था असल्यातरी त्या दोन्हीचा प्रवर्तक, संस्थापक हे विजय शेखर शर्माच आहेत. २०१८ ते २०२३ या पाच वर्षांच्या काळात फॉरेन एक्सचेंज मॅनेजमेंट रेग्युलेशनच्या अटींअंतर्गत आरबीआयने पेटीएम बँकेचे केवायसी नॉर्मस् दुरुस्त करा याबाबत किमान सहा वेळा इशारे दिले आणि दंडही केला. तसेच बँकिंग रेग्युलेशनचे पालन करत नसल्याबद्दल सज्जड दमही आरबीआयकडून भरण्यात आले. गेल्या काही वर्षांत देशातील बहुतेक बँक खातेधारकांनी आपले आधारकार्ड आणि पॅनकार्ड लिंक केलेले असल्याने त्या सर्वांचा डाटा सरकार दरबारी नोंदवला गेलेला आहे. परंतु पेटीएमकडे असणारा डाटा काहीसा प्रश्नार्थक आहे, असे आरबीआयचे निरीक्षण असून ते फॉरेन एक्सचेंज मॅनेजमेंट ॲक्टचे उल्लंघन करण्याच्या अनुषंगाने आहे. आंतरराष्ट्रीय विदेशी विनिमय चलनाचे जे व्यवहार आहेत त्याबाबत आरबीआयने काही प्रश्न उपस्थित केले आहेत.

नोव्हेंबर २०१६ मध्ये नोटबंदी जाहीर झाल्यानंतर १०० दिवसांतच अलीबाबा डॉट कॉम या संस्थेचा प्रमोटर जॅक मा याने पेटीएममधील ३ ० ते ३२ टक्के भाग खरेदी केले. जॅक मा हा जगातील अब्जाधिशांच्या नामावलीतील प्रख्यात उद्योगपती असून जगातील पाचव्या क्रमांकाचा सर्वांत मोठा गुंतवणूकदार म्हणून ओळखलाजातो. आरबअीयने कारवाई करण्यापूर्वी जॅक मा याने आपला स्टेक काढून घेतलेला आहे. पेटीएम बँकेतील काही व्यवहार चीनमधील फॉरेन एक्सचेंजशी संबंधित आहेत आणि ते संशयास्पद आहेत, असे आरबीआयला वाटते. त्यामुळे आरबीआयने पेटीएम बँकेच्या केवायसीतील सर्व तपशील तपासण्यासाठी ३१ जानेवारी रोजी एक फतवा काढला. त्यानुसार पेटीएममध्ये नवीन सभासद नोंदवता येणार नाहीत असे सांगितले आणि २९ फेब्रुवारीनंतर पेटीएम बँकेचा परवाना रद्द करण्याचा इशारा दिला आहे. याचा अर्थ पेटीएम बँक ही आता पुढील महिन्यापासून इतिहासजमा होणार असल्याने पेटीएम तरी सुरू राहील की नाही अशी शंका आता उपस्थित होत आहे. आज देशातील ९ ते १० टक्के लोकांकडे पेटीएम आहे. मुख्य म्हणजे सर्वसामान्यांचा सहभाग यामध्ये अधिक आहे. अशा वेळी पेटीएमवर गंडांतर आल्यास त्यांच्याकडे असणारा क्युआरकोड निरुपयोगी ठरणार आहे. ‘पेटीएम करो’ची ट्युन बसवलेले सर्व व्यापारी, दुकानदार, विक्रेते आपले अकौंट अन्य बँकांकडे हस्तांतरीत करु शकतात. त्यामुळे २९ फेब्रुवारीनंतर लोकच पेटीएम बंद करोच्या दिशेने जातील अशी शक्यता आहे. सध्या समोर आलेल्या माहितीनुसार पेटीएममध्ये जॅक माची अद्यापही ११ टक्के मालकी आहे. नोटबंदीच्या काळानंतर जॅक मा याने भारतातील गुंतवणूक वाढवली होती.

हिंडेनबर्गच्या अहवालातून अदानींच्या शेल कंपन्यांचे समभाग४५ पट फुगवले आहेत, असे तथ्य मांडण्यात आल्यानंतर ज्याप्रमाणे या समभागांत जोरदार घसरण झाली त्याचप्रमाणे आरबीआयने बडगा उचलल्यानंतर पेटीएमच्या समभागातही २० टक्क्यांची घसरण पाहायला मिळाली आहे. कदाचित येणाऱ्या काळात पेटीएम बँक आणि पेटीएम या फिनटेक कंपनीचे समभाग अजूनही कोसळण्याची शक्यता आहे. पेटीएमचा फुगा फुटणे ही बाब चिंताजनक आहे. कारण यामुळे नवीन अर्थव्यवस्थेचे निदर्शक असलेली तंत्रज्ञानावर आधारलेली आर्थिक देवाणघेवाणीच्या व्यवहारांची व्यवस्था मोडकळीस येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अर्थात, टेक्नॉलॉजीच्या दृष्टीने इतर बँका जर योग्य पद्धतीने काम करु लागल्या तर हा व्यवसाय चांगला चालू शकतो. शेवटी

तंत्रज्ञानाला जात नसते, धर्म नसतो, भाषा नसते आणि पंथही नसते. टेक्नॉलॉजी ही जगड्व्याळ आहे, ग्लोबल आहे. पण त्या-त्या देशातील मध्यवर्ती बँकेची नियमावली, सुरक्षा यंत्रणेची नियमावली याचे उल्लंघन न करता आणि ग्राहकांच्या हितसंबंधांना धक्का न लावता जर फिनटेक कंपन्यांचे व्यवहार होत राहिले तर ती आदर्श गोष्टही आहे. किंबहुना म्हणूनच ती भारतात लोकप्रिय झाली. परंतु सायबर गुन्हे जसे वाढतात तसेच या नऊ कोटी ग्राहक असणाऱ्या पेटीएममध्ये मनीलाँड्रिंग होत नाहीये ना याचाही विचार केला पाहिजे. आज मनीलाँड्रिंगसाठी ईडी सर्वत्र धावाधाव करते आहे; पण फिनटेकमधील मनीलाँड्रिंगकडे ईडीचे दुर्लक्ष होत आहे. आज आयएलएफएस, एचडीआयएल यांसारख्या हौसिंग लोन कंपन्या कोसळत चालल्याचे दिसत आहे. क्रेडिट कार्डांचे २.५ लाख कोटींचे कर्ज आजघडीला थकित आहे. हे प्रमाण देशातील एकूण किरकोळ कर्जाच्या पाच टक्के आहे. तशाच प्रकारे फिनटेकमध्ये गुंतलेल्या कंपन्यांवरचा अविश्वास वाढण्याची शक्यता आहे. कारण त्यामध्ये सायबर फ्रॉड, मनीलाँड्रिंग वाढत आहे. अशा स्थितीत आरबीआयला आता हे प्रकरण ईडीकडे सोपवावेच लागणार आहे. पेटीएमच्या प्रकरणातून देशात तयार झालेले नवस्टार्टअप्स हे किती तकलादू आहेत, याचे पितळ आरबीआयनेच उघडे पडले आहे. पेटीएमसारख्या फिनटेकचा फुगा फुटल्यास तो सर्वसामान्यांसाठी मोठा फटका असेल. कारण प्रत्यक्ष बँकेत न जाता, प्रत्यक्ष दुकानात न जाता वस्तू व सेवांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार, रोख रक्कम हस्तांतरणाचे व्यवहार अत्यंत गतिमानतेने आणि सुलभरित्या पार पडत होते.

वास्तविक, २०१८ पासून जर रिझर्व्ह बँकेला याबाबत संशय होता तर मग आतापर्यंत विजय शेखर शर्मा यांचे उपद्व्याप का उघडकीस आणले नाहीत, याही प्रश्नाचे उत्तर जनतेला मिळाले पाहिजे. ग्लोबल ट्रस्ट बँक जशी पाहता पाहता कोसळली तशाच प्रकारची स्थिती आज पेटीएमवर आली आहे. पेटीएममधील 'फेमा'चे व्यवहार पाहता ही कंपनी घेण्यासाठी आजघडीला कोणीही पुढे येणार नाही, अशी स्थिती आरबीआयने आणली आहे. सरकारपुरस्कृत एखादी संस्था बोगस असू शकते, हाच या प्रकरणाचा अंतिम धडा म्हणावा लागेल.





अर्थनीती

# सुधारणांची प्रतीक्षा

डॉ. जयंतीलाल भंडारी
ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ

***लोकसभा निवडणुकीनंतर नव्या सरकारने काही महत्त्वाच्यां सुधारणांना कायदेशीर अधिष्ठान देणे आणि त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. कृषी, कामगार, भूमी आणि अन्य सुधारणांची गरज आहे. कामगार कायद्यात १९९० च्या दशकांत सुधारणा करणे गरजेचे होते आणि ते आतापर्यंत झालेले नाही. अधिक रोजगार निर्मितीसाठी अप्रेटिंस योजनांवर भर देण्याची गरज आहे. यामुळे कमी खर्चात मनुष्यबळ आणि कौशल्य मिळू शकते. शहरात अधिकाधिक रोजगार तयार करण्यासाठी केंद्र आणि राज्याच्या अधिनिस्त संस्था, नगरपालिका आणि स्थानिक संस्थांना जादा अधिकार द्यावे लागतील.***

नऊ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका ग्लोबल बिझनेस समिटमध्ये केंद्र सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात नवा भारत वेगाने काम करेल, असे विश्वास व्यक्त केला. भारत जगातील तिसरी मोठी आर्थिक शक्ती म्हणून नावारुपास येत असल्याचे दिसत आहे. आपला अर्थिक विकासाचा दर सतत वाढत असून महसुल तुट कमी होत आहे. उत्पन्न वाढविणे आणि गरीबी कमी करण्याचा हा काळ आहे. २५ कोटी नागरिक गेल्या दहा वर्षांत गरिबीच्या बाहेर आले आहेत.

मोदी म्हणाले, आपल्या सरकारने सर्व धोरणात स्थैर्य आणि सातत्य राहण्यावर अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. प्रत्येक बजेटमध्ये चार गोष्टींवर अधिक भर दिला गेला. पायाभूत सुविधांचा विकास, उत्पादन वाढविण्यासंदर्भात खर्चात विक्रमी तरतूद करणे, कल्याणकारी योजना, अनाठायी खर्चांना लगाम व आर्थिक शिस्त. त्याचे उत्साहजनक परिणाम मिळाल्याचे पंतप्रधान म्हणाले. ८ फेब्रुवारी रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनीही लोकसभेत मोदी सरकारच्या कार्यकाळाची माहिती देणारी श्वेतपत्रिका मांडली. यात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली दहा वर्षात आर्थिक विकास वेगाने झाला असल्याचे म्हटले आहे. या सुधारणा जन धन योजना, आधार आणि मोबाईल आधारित अंशदान वितरणात सुधारणा (जेएएम), जीएसटी तसेच कर्जवसुली आणि वाटप सुधारणा आणि दिवाळखोरी संहिता (आयबीसी) याचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. जागतिक पातळीवर प्रत्यक्ष परकी गुंतवणुकीतील घसरणीचा माहोल असताना भारत मात्र जगातील सर्वाधिक परकी गुंतवणूक मिळवणाऱ्या देशांत सामील झाला आहे. भारताचा परकी चलनसाठा वेगाने वाढला आहे. भारतीय शेअर बाजार हा जगात सर्वात उच्चांकी पातळीवर असल्याचे सांगत आहे.

देशात २०१४ मध्ये २३४ सार्वजनिक उपक्रम होते आणि आज त्याची संख्या २५४ झाली आहे. उद्योग, कृषी, सेवा क्षेत्राचा देखील वेगाने विकास झाला आहे. भारत आर्थिक विकासासह जागतिक शक्ती म्हणूनही समोर आला आहे. जागतिक विकासाचे इंजिन म्हणून भारताकडे पाहिले जात आहे. भारताकडे जागतिक कंपन्यांचा ओघ

सुरू झाला आहे. तसेच देशाच्या विकासात आर्थिक शिस्तीने महत्त्वाची भूमिका बजावली, हे देखील पाहिले पाहिजे. जगातील प्रमुख जागतिक क्रेडिट रेटिंग संस्थांनी देखील केंद्र सरकारचे आर्थिक धोरण आणि अर्थसंकल्प हा विकासाला अनुकुल असल्याचे म्हटले आहे. यानुसार भारताचा विकास, भारतातील गुंतवणूक आणि भारताची आर्थिक स्थिती भक्कम होण्यास हातभार लागार आहे. 'फिच' ने म्हटले, लोकसभा निवडणुकीच्या अगोदर सादर झालेला भारताच्या हंगामी अर्थसंकल्पात २०२४-२५ मध्ये महसूल तूट मागील दोन वर्षाच्या तुलनेत वेगाने कमी करण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. त्याचबरोबर भांडवली तरतूद देखील वाढली आहे. आता नव्या सरकारकडून सादर होणाऱ्या संपूर्ण अर्थसंकल्पात आर्थिक सुधारणांसंबंधी पावले टाकली जाईल, अशी अपेक्षा आहे. याप्रमाणे 'एसअँडपी' ने म्हटले, या काळात भारताची सॉव्हेरिन रेटिंग ही सरासरीच्या तुलनेत वरच्या पातळीवर आहे. भारताचे नवे सरकार व्यापक पायाभूत सुविधा योजनांवरील गुंतवणुकीत वाढ करून आर्थिक सुधारणा आणि अन्य भांडवली तरतुदीत भर घालेल व महसूल तूट कमी करण्यात यशस्वी ठरेल. याप्रमाणे भारताची रेटिंग आणखी सुधारेल. 'एसअँडपी'ने म्हटले, भारतात भाजपच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकार पुन्हा येत असेल तर धोरणात सातत्य राहू शकते. अशावेळी लोकसभा निवडणुकीनंतर नव्या सरकारने काही महत्त्वाच्यां सुधारणांना कायदेशीर अधिष्ठान देणे आणि त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. कृषी, कामगार, भूमी आणि अन्य सुधारणांची गरज आहे. कामगार कायद्यात १९९० च्या दशकांत सुधारणा करणे गरजेचे होते आणि ते आतापर्यंत झालेले नाही. केंद्र सरकारने २९ कामगार कायद्यांना चार कामगार कायद्यांत परावर्तित करण्याची महत्त्वकांक्षी योजना अस्तित्वात आणली. सरकारने इंडस्ट्रियल रिलेशन कोड २0२0 ऑक्यूपेशन सेफ्टी, हेल्थ अँड वर्किंग कंडिनन्श कोड २०२०, कोड ऑन सोशल सिक्यूरिटी, २०२० आणि वेतन संहिता कोड २०१९ हे मागील वर्षात डिसेंबरमध्ये एकावेळी लागू करण्याचे संकेत दिले. मात्र ते अद्याप लागू झालेले नाहीत. या कायद्याच्या आधारे कामगारांना वेतनाची हमी, आरोग्य सुरक्षा आणि सामाजिक सुरक्षा देण्याच्या व्याप्तीत वाढ करण्यात आली आहे. त्यावेळी या कायद्यानुसार सध्याच्यां कामगार कायद्यातील कठोरपणा कमी करणे आणि नियमांची अनिवार्यता कमी करणे यासारख्या तरतूदी केल्या असून त्यानुसार उद्योग उभारणीची कटकटी कमी होतील आणि एकप्रकारे रोजगारवाढीला मदत मिळेल. नव्या प्रस्तावित कामगार कायद्यानुसार कामगारांना अनेक फायदे होत असल्याचे चिन्हे असताना त्याचेवळी उद्योजकांना व्यवसाय करणे अधिक सुलभ करण्यासाठी देखील अनेक तरतूदी केल्या आहेत.

सध्याच्या काळात अनेक देशांतील कंपन्या चीनमधून स्थलांतरित होत असून उद्योगपुरक कामगार कायद्याच्या आधारे त्यांना आपल्याकडे आकर्षित करू शकतो. व्हिएतनाम, बांगलादेश आणि अन्य देशांतील लवचिक कामगार कायद्यामुळे त्यांना लाभ मिळताना दिसत आहे. अशावेळी भारताच्या नव्या सरकारने देखील नवीन कामगार कायद्यातून संधी निर्माण करण्याचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रस्तावित कामगार कायदा हा कायापालट करण्याबरोबरच कंपनी आणि कर्मचारी व सरकार या तिघांसाठी फायदेशीर राहू शकतो. आता अधिक रोजगार निर्मितीसाठी अप्रेटिंस योजनांवर भर देण्याची गरज आहे. अप्रेटिसशिपमुळे कमी खर्चात मनुष्यबळ आणि कौशल्य मिळू शकते. आता शहरात अधिकाधिक रोजगार तयार करण्यासाठी केंद्र आणि राज्याच्या अधिनिस्त संस्था, नगरपालिका आणि स्थानिक संस्थांना जादा अधिकार द्यावे लागतील आणि या गोष्टीचा समावेश करावा लागेल.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हंगामी अर्थसंकल्पात नव्याने विकसित होणाऱ्या क्षेत्रात संशोधन आणि कल्पनांना चालना देण्यासाठी एक लाख कोटी रुपयांच्या निधीची उभारण्याची घोषणा केली आहे. मात्र संशोधन आणि विकासाच्या क्षेत्रात एवढी गुंतवणूक पुरेशी नाही. भारतात संशोधन आणि विकासातील तरतूद ही अगोदरच कमीच आहे. राष्ट्रीय सकल देशार्तंगत उत्पादन (जीडीपी) च्या तुलनेत २०२०-२१ मधील तरतूद केवळ ०.६४ टक्के होती. जागतिक सरासरीच्या २.७१ टक्क्यांपेक्षा खूपच कमी तरतूद आहे. आपल्या देशात बड्या आयटी कंपन्या तसेच अन्य कंपन्या देखील संशोधन आणि विकासात आपल्या उत्पन्नाच्या एक टक्क्यांपेक्षा कमी खर्च करतात. याउलट अमेरिका, चीन, जपान आणि जर्मनीसारख्या देशांत आयटी आणि अन्य क्षेत्रातील कंपन्यांची भरभराट होण्याचे प्रमुख कारण म्हणजे संशोधन तसेच नव्या कल्पनांना प्रोत्साहन देणे आणि अधिक खर्च करणे होय. जागतिक बौद्धिक संपदा संस्था (पेटंट) च्या ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्समध्ये भारत २०२३ या वर्षात ४० व्या स्थानी आहे. यावरून भारत संशोधन आणि नाविण्यपूर्ण शोधांना प्राधान्य देण्यास खूपच मागे आहे, असे दिसते. एकुणातच तंत्रज्ञानावर सर्वकाही अवलंबून असलेल्या जगात केवळ सरकारकडून योजनांवरील खर्च वाढवणे पुरेसे नाही तर याव्यतिरिक्त भारतातील मोठ्या कंपन्यांना देखील स्वत:ची झाकून ठेवलेली मूठ उघडावी लागणार आहे.




दखल

# एव्हरग्रँडची दिवाळखोरी आणि चीन

सीए संतोष घारे

***गेल्या चार दशकांपासून जागतिक अर्थसत्ता बनण्याच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेने पछाडलेल्या चीनच्या विकासधोरणांमधील फोलपणा कोविडोत्तर काळात प्रकर्षाने समोर येऊ लागला आहे. लॉकडाऊनबाबतच्या निर्णयांमुळे तेथील अर्थव्यवस्थेला लागलेली उतरण, घटलेले औद्योगिक उत्पादन, घटलेली निर्यात यामुळे चीनी धोरणकर्ते चिंतेत असतानाच एव्हरग्रँड या चीनमधील बांधकाम विकसक कंपनीच्या दिवाळखोरीचे आदेश हाँगकाँग न्यायालयाने दिले आहेत. एव्हरग्रँड ही आधुनिक जगाच्या इतिहासातील सर्वाधिक कर्ज असणारी कंपनी असल्याने या  निर्णयाचे अत्यंत दूरगामी परिणाम चीनच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहेत. तथापि, हे प्रकरण जगभरातील सर्वच देशांसाठी उद्बोधक ठरणारे आहे.***

संपूर्ण जगाला ज्या चीनच्या गतिमान आर्थिक विकासाच्या प्रारुपाची भुरळ पडली होती त्या चीनला कोविड महामारीनंतर आर्थिक उतरती कळा लागल्याचे गेल्या चार वर्षांमध्ये स्पष्टपणाने दिसून आले. विशेषतः गेल्या सहा महिन्यांमध्ये जाहीर झालेली आकडेवारी पाहिल्यास चीनवरील अर्थसंकट दिवसागणिक वाढत चालल्याचे दिसते. घटणारे औद्योगिक उत्पन्न, घटलेली क्रयशक्ती, निर्यातीत झालेली घसरण, बेरोजगारीचे वाढते प्रमाण यांसह आर्थिक आघाडीवरील सर्वच टप्प्यांवर चीनमधून सातत्याने नकारात्मक बातम्या समोर येत आहेत. चीनमधील बांधकाम क्षेत्रातील एव्हरग्रँड या कंपनीच्या कोलमडलेल्या अर्थकारणाच्या वृत्ताने २०२१ मध्ये अवघ्या जगाला हादरवून सोडल्याचे अनेकांच्या स्मरणात असेल. १९९६ मध्ये बाटलीबंद पाण्याचा व्यवसाय करणारी ही चीनीकंपनी नंतर बांधकाम क्षेत्रात उतरली आणि मध्यमवर्गासाठी एक उत्तम योजना आखून पाहता पाहता चीनच्या रिअल इस्टेटमधील सर्वांत मोठी कंपनी बनून गेली. चीनच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये अर्थात जीडीपीमध्ये तिथल्या रीअल इस्टेट क्षेत्राचा सुमारे २५ टक्क्यांहून जास्त हिस्सा आहे. त्याच रीअल इस्टेट क्षेत्रातली एव्हरग्रँड ही सर्वात बलाढ्य आणि सर्वाधिक हिस्सा असलेली कंपनी आहे. चीनमधील २८० शहरांमध्ये १३०० हून अधिक प्रकल्प उभे करणाऱ्या या या कंपनीचे संचालक झँग युआनलिन यांचा समावेश थेट फोर्ब्जच्या श्रीमंत लोकांच्या यादीत करण्यात आला होता. त्यावेळी त्यांची बरीच चर्चा झाली; परंतु या कंपनीच्या अर्थकारणाची दुसरी बाजू फारशी प्रकाशात आली नाही. ती म्हणजे कंपनीवरील कर्जाचा डोंगर. या कंपनीवर सुमारे ३०० अब्ज डॉलर्सचे म्हणजेच २४ लाख कोटींचे कर्ज आहे. आधुनिक जागतिक आर्थिक इतिहासात एकाच कंपनीवर असलेले हे सर्वांत मोठे कर्ज मानले जाते. चीनच्या विदेशी रोख्यांमध्ये म्हणजे फॉरेन बाँड्समध्ये या कंपनीची ९ टक्के हिस्सेदारी आहे. परंतु कोरोना महामारीच्या संकटामुळे या कंपनीच्या अर्थकारणाला तडा गेला आणि कंपनीचा पाय खोलात जाऊ लागला. स्थिती इतकी खालावली की डोक्यावर असणाऱ्या कर्जाची परतफेड करणे कंपनीला

अशक्य होऊन बसले आणि दिवाळखोरीच्या दिशेने गाडी सरकू लागली. एव्हरग्रँडचे संचालक हुई का यान यांच्याकडे महागड्या कार, नौका, जहाजे आणि आलिशान बंगले होते. परंतु कंपनीवरील अर्थसंकटामुळे त्यांना आपली वैयक्तिक मालमत्ता विकण्यास भाग पडले. कंपनीवरील ३०० अब्जांचे कर्ज फेडण्यासाठी त्यांना बंगले आणि खासगी जेटही विकावे लागले. त्यांच्या संपत्तीमध्ये ९३ टक्क्यांची घट नोंदवली गेली. एव्हरग्रँडच्या पडझडीमुळे चीनी अर्थकारणालाही अक्षरशः सुरुंगलागला. कारण या कंपनीला दिलेल्या बँका आणि वित्तीय संस्थांही यामुळे संकटात सापडल्या. एव्हरग्रँडमध्ये २ लाख कर्मचारी कामाला आहेत. याखेरीज कंपनीवर अवलंबून असणाऱ्या उपघटकांची तर मोजदाद करणेही कठीण. या सर्वांच्याच भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला. अलीकडेच, हाँगकाँग न्यायालयाने दिवाळखोर एव्हरग्रँड अवसायानात काढण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाच्या आदेशानंतर एव्हरग्रेंड आणि तिच्या सूचीबद्ध उपकंपन्यांच्या शेअर्सच्या खरेदी-विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे चीन एका प्रचंड मोठ्या संकटात सापडणार आहे.

दोन वर्षांपूर्वी एव्हरग्रँडकडे असणारी रोख रक्कम संपली आहे. परिणामी, न्यायालयाने कंपनीची मालमत्ता विकून कर्ज वसूल करण्याचे आदेश दिले आहेत. प्रचंड कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या कंपनीला कर्जाची परतफेड करण्यासाठी एक योजना सादर करण्यास सांगण्यात आले होते, परंतु १८ महिन्यांत याबाबत एव्हरग्रँडला काहीही करता आले नाही.

एव्हरग्रेंड बंद झाल्यामुळे आधीच डळमळलेल्या चीनला मोठा धक्का बसला आहे. विशेषतः चीनमधील प्रॉपर्टी मार्केट पुरते हादरले आहे. आधीच चीनचे प्रॉपर्टी मार्केट ९ वर्षातील सर्वात वाईट टप्प्यातून जात आहे. अशा वेळी एव्हरग्रेन्डे बुडल्याने संपूर्ण रिअल इस्टेटवर अत्यंत नकारात्मक परिणाम होणार आहे. हा परिणाम केवळ रिअल इस्टेटवरच नाही तर इतर क्षेत्रांमध्येही जाणवणार आहे. रिअल इस्टेटमधील या आर्थिक त्सुनामीचा फटका चीनच्या बँकिंग क्षेत्राला बसू लागला आहे. चीनच्या शेअर बाजाराने ५ वर्षातील नीचांकी पातळी गाठली आहे. एव्हरग्रेंड कंपनी बुडाल्याने बेरोजगारीचे संकट आणखी वाढणार आहे. कारण एव्हरग्रेंड ही कंपनी चीनमध्ये दरवर्षी ३० ते ४० लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करते. कंपनी दिवाळखोरीत निघाल्याने बँकांवर मोठ्या प्रमाणात एनपीएचा बोजा वाढत असून त्याचा चीनच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होणार हे निश्चित आहे.

एखादी कंपनी दिवाळखोरीत निघणे ही बाब तशी नवी नाही. सामान्यतः अशा प्रकरणांमध्ये कंपनी व्यवस्थापनाची बेजबाबदार धोरणेच जबाबदार असतात असे इतिहास सांगतो. एव्हरग्रँडबाबतही तेच झाले. वेकर्जाच्या ओझ्याकडे दुर्लक्ष करताना आक्रमक विस्तार धोरणांमुळे कंपनी अडचणीत आली. बँकांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्याऐवजी कंपनीने आपल्या विस्तारावर अधिक लक्ष केंद्रित केले. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे या कंपनीने आपण कर्जात बुडाल्याचे बराच काळ बाजाराला कळूच दिले नाही. तथापि, कोविडोत्तर काळात चीनमधील रिअल इस्टेटमधील मंदीमुळे कंपनीच्या प्रकल्पांच्या विक्रीला ब्रेक लागला. प्रकल्प विकले जात नसल्याने कर्जाची परतफेड करणे अशक्य झाले आणि आता ही कंपनी ठप्प झाली आहे. कंपनी बंद झाल्यामुळे त्याच्या प्रकल्पात फ्लॅट बुक करणाऱ्यांना त्याचा फटका बसणार आहे. एव्हरग्रेंडच्या अर्ध्या पूर्ण झालेल्या प्रकल्पात ज्यांनी फ्लॅट बुक केले आहेत त्यांचे कष्टाचे पैसे वाया जाणार आहेत. दुसरीकडे या कंपनीसोबत व्यवसाय करणारे छोटे उद्योग आर्थिक संकटात सापडणार आहेत. त्या छोट्या कंपन्या दिवाळखोरीत निघण्याचा धोका आहे. एव्हरग्रेंड क्रायसिसमुळे परदेशी गुंतवणूकदारांचा चीनबद्दल भ्रमनिरास होण्याची शक्यता आहे. भारतातील टाटा, सेल, जिंदाल, अदानी यांसारख्या पोलाद, रसायने आणि धातू क्षेत्रातील अनेक कंपन्या चिनी बांधकाम विकसक कंपन्यांसोबत व्यवसाय करतात. यामध्ये एव्हरग्रँडचाही समावेश आहे. त्यामुळे हाँगकाँग न्यायालयाच्या निर्णयाचा फटका या भारतीय कंपन्यांनाही बसणार आहे.

जागतिकीकरणाच्या काळात सर्वच देश आणि सर्वच देशांमधल्या व्यवस्था परस्परावलंबी झाल्या आहेत. राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. त्यामुळे एखाद्या देशातील जागतिक मंदीच्या काळाच सर्वच देशांना त्याचा फटका बसतो. विशेषत: आपल्या शेजारी देशांमध्ये घडणाऱ्या आर्थिक, सामाजिक, राजकीय घटनांचा आपल्यावर कमी-जास्त परिणाम होतच असतो. चीन ही जगातील एक महत्त्वाची अर्थसत्ता आहे. जगाचे मॅन्युफॅक्चरींग हब म्हणून चीनने ओळख मिळवली आहे. त्यामुळे एव्हरग्रँडच्या दिवाळखोरीमुळे चीनी अर्थव्यवस्थेला बसलेल्या तडाख्यांच्या झळा जगभरात जाणवू शकतात. भारतासारख्या देशामधील बांधकाम उद्योगावर याचा प्रतिकूल परिणाम जाणवण्याची शक्यता सद्यस्थितीत दिसत नाहीये. कारण २०२१ मध्ये या संकटाची सुरुवात झाली असतानाही २०२३ मध्ये भारतातील रिअल इस्टेट उद्योगात घरांची विक्रमी विक्री झाली आहे.

असे असले तरी एव्हरग्रँडच्या दिवाळखोरीचे प्रकरण हे जगासाठी उद्‌बोधक करणारे आणि धोरणात्मक आत्मचिंतन करण्यास भाग पाडणारे आहे. प्रामुख्याने दोन गोष्टी यामध्ये महत्त्वाच्या आहेत. यातील एक बाब कंपनी व्यवस्थापनासाठी महत्त्वाची आहे, ती म्हणजे कोणत्याही परिस्थितीत कर्जाचा डोलारा वाढू न देण्याची खबरदारी घेणे. विशेषतः आजच्या काळात उदयास आलेल्या स्टार्टअप्ससाठी हा धडा गरजेचा आहे. बायजेयूसारख्या कंपन्यांपुढील अर्थसंकट ही बाब अधिक ठळक करणारे आहे. दुसरी बाब आहे ती शासनकर्ते आणि मध्यवर्ती बँकेने देशातील कंपन्यांच्या आर्थिक नियमनाबाबतची शिस्त कोणत्याही परिस्थितीत पाळली पाहिजे. तरच अशा प्रकारची संकटे टळू शकतील.

# विनम्र आवाहन




*फुल ना फुलाची*
*पाकळी हवी...*
*साकारण्या संस्थेची*
*इमारत नवी !*


नमस्कार !

उद्योजक मित्र हो, सातत्याने गेली 16 वर्षे आपल्या समोर चाललेला आपल्या असोसिएशनचा प्रवास एका स्वप्नपूर्तीच्या टप्प्यावर येऊन पोहोचला आहे. संस्थेने पसरलेल्या विशाल पंखावर आता फुंकर मारुन जीव ओतायचा आहे. आपल्याला अतिभव्य अशा नूतन इमारतीचा संकल्प करायचा आहे.

सध्याच्या आपल्या कार्यालयाशेजारीच एक भव्यदिव्य वास्तुरेखांकन आम्ही बनवलेले आहे. हे रेखांकन बनवताना भविष्यात लागणाऱ्या उद्योजकांच्या सर्व गरजांचा विचार केलेला आहे. नूतन वास्तूमध्ये उद्योगाच्या सोईसाठी एक भव्य सभागृह, संस्थेसाठी सुसज्ज ऑफीस, ग्रंथालय, उद्योजकांसाठी कॅन्टीन, गेस्ट साठी कॅफेटेरिया, आवश्यक गोष्टींसाठी दुकाने, विविध ऑफिसेस, बँक तसेच सर्व उद्योगातील कुशल कामगारांची गरज लक्षात घेऊन "कौशल्य विकास केंद्र" करण्याचा मानस केला आहे. या केंद्रासाठी लागणाऱ्या मशीन्स व टुलरुमचा देखील विचार केलेला आहे. सदर वास्तुच्या स्वप्नपूर्ततेसाठी आपल्याच लोकांकडून आर्थिक मदत जमा करावयाची आहे. यासाठी आपल्या सारख्या दानशूर व्यक्तिंकडून आम्ही मदतीची अपेक्षा करीत आहोत. आपण दिलेल्या एका दान-पाकळीने या फुलाला आकार येणार आहे. आपण आपल्याच नावाने, अथवा आस्थापनेच्या नावाने किंवा आपल्या प्रियजनांच्या नावाने देणगी देऊ शकता. सदरची देणगी ही इन्कमटॅक्स नियमानुसार 80 G व CSR या दोन्हीसाठी पात्र असून संस्थेला 80 G व CSR ही दोन्ही सर्टिफिकेट नोंदणीकृत मिळालेली आहेत.

आपण एखाद्या भागाचा खर्च देखील उचलू शकता. आपल्या माहिती करिता सदर कामाचे रेखांकन व खर्चाचे अंदाज पत्रक सोबत देत आहोत. आपली ही मदत संस्थेच्या इतिहासात कायमचीच कोरली जाणार आहे व येणाऱ्या नवउद्योजक पिढ्यांना तो एक आदर्श व प्रेरणास्त्रोत असेल.


| श्री. सुरेश क्षीरसागर | श्री. विठ्ठल पाटील | श्री. संजय जोशी | श्री. मोहन कुशिरे | श्री. हरिश्चंद्र धोत्रे |
|---|---|---|---|---|
| ऑन. ट्रेझरर | ऑन. सेक्रेटरी | बिल्डींग कमिटी-अध्यक्ष | उपाध्यक्ष | अध्यक्ष |
| 8308949500 | 9881204647 | 9225803098 | 9604112341 | 9422412903 |



कला

# बहुरूपी अशोकमामा

आयुष्याच्या जवळपास 76  वर्षां पैकी 70 वर्षे आपल्या अभिनयाला देऊन, या कलेस एका एका उंचीवर नेऊन ठेवणाऱ्या अशोक सराफ यांना राज्य सरकारचा 'महाराष्ट्र भूषण' हा पुरस्कार मिळणे, ही स्वाभाविकपणे आनंदाचीच गोष्ट आहे. नाटक, चित्रपट आणि दूरचित्रवाणी मालिका या तिन्ही माध्यमांत लीलया वावरणाऱ्या या कलावंतास नाट्य व चित्रपट क्षेत्रात 'अशोकमामा' म्हणूनच ओळखले जाते. आजकाल कोणीही कलावंत एखादी मालिका वा चित्रपट मिळाला, तरी त्याच्या अल्पायुषी लोकप्रियतेमुळे स्वतःला 'ग्रेट' समजू लागतो. अतिप्रसिद्धीमुळे कलावंतांची अनेकदा माती होते. कारकिर्दीत प्रचंड यश मिळूनही अशोक सराफ मात्र अत्यंत निगीं, साधे आणि निर्मळ राहिले आहेत. त्यांच्या डोक्यात कधीही हवा गेली नाही की, स्टारचे नखरे त्यांनी कधी दाखवले नाहीत. मुळात ज्यांनी कलेशिवाय आयुष्यात कशालाच महत्त्व दिले नाही, असे प्रख्यात रंगकर्मी गोपीनाथ सावकार हे सराफ यांचे मामा. त्यांच्या नाटक कंपनीत ते स्टेजवर अक्षरशः रांगले आहेत. वयाच्या सातव्या वर्षी एकांकिकेत त्यांनी काम केले आणि दहाव्या वर्षी 'संशयकल्लोळ' नाटकामध्ये भादव्याची भूमिका त्यांनी केली. वि. वा. शिरवाडकरांच्या 'ययाती देवयानी' नाटकात त्याकाळचे प्रसिद्ध अभिनेते छोटू सावंत काम करत; परंतु त्यांना अर्धांगवायू झाल्यामुळे अशोकमामा यांनी त्यांची विदूषकाची भूमिका केली. सुरुवातीलाच मास्टर दत्ताराम रामदास कामत यांच्यासारख्या कलावंतांबरोबर काम करायला मिळाले आणि त्यामुळे अभिनयाच्या कुठल्याही पाठशाळेत न जाता, थेट प्रक्टिकल्समधूनच ते शिकत गेले. वाक्याला लय कशी असावी, पॉझ कुठे घ्यायचा, एखादा प्रसंग विकसित कसा करायचा, या सर्व गोष्टी सावकार यांच्याकडूनच ते शिकले. महाराष्ट्रात एकेकाळी दिनकर कामण्णा, दामुअण्णा मालवणकर, शरद तळवलकर, राजा गोसावी, बसंत शिंदे अशा कलावंतांनी आपल्या कॉमेडीने असंख्य रसिकांचे रंजन केले. सराफ यांनी प्रारंभी प्रख्यात दिग्दर्शक गजानन

जागीरदार यांच्या 'दोन्ही घरचा पाहुणा' चित्रपटात डिटेक्टिव्हची भूमिका केली; परंतु नाट्याभिनयाच्या सवयीमुळे त्यांचे हे काम लक्षवेधी झाले. चित्रपटात क्लोजअपचे व्यवधान ठेवून वेगळ्या पद्धतीने काम करावे लागते, याचे भान त्यांना नंतर आले. दादा कोंडके यांच्या 'पांडू हवालदार' चित्रपटातील सखारामच्या भूमिकेमुळे 'अशोक सराफ' हे नाव प्रेक्षकांच्या मनावर कोरले गेले. दादांचा अभिनय लोकनाट्याच्या धाटणीचा, हे लक्षात घेऊन त्यास प्रतिसाद कसा द्यायचा, याचे भान ठेवून त्यांनी त्यात भूमिका केली. 'अशी ही बनवाबनवी' मधील त्यांची 'धनंजय माने' ही व्यक्तिरेखा आजही लोकांच्या स्मरणात आहे. दुधाच्या रांगेत खूप वेळ लागणार, हे लक्षात आल्यानंतर पोटात कळ येऊन बसकण मारणारा धनंजय माने, 'धनंजय माने इथेच राहतात का, हा मराठीतल्या हिट संवादांपैकी एक संवाद आहे. त्यामध्ये लक्ष्मीकांत बेर्डे, अशोक सराफ, सुधीर जोशी आणि सचिन पिळगावकर जो धुमाकूळ घालतात, तो कमालीचा आहे. ज्येष्ठ अभिनेते निळू फुले आणि अशोक सराफ यांची जोडी कमालीची हिट ठरली होती, हे अगदी ठळकपणे याठिकाणी नमूद करावेच लागेल. 'प्यार किये जा' या चित्रपटावरून बनवलेल्या 'धूमधडाका'मधील अशोकमामांच्या म्हाताऱ्याच्या भूमिकेतील 'वख्खा विख्खी वुख्खू यामुळे प्रचंड मजा येते. तोंडात स्मोकिंग पाईप घेऊन संवाद म्हणायचे होते. पाईपमधील तंबाखू तीव्र असल्यामुळे तो ओढल्यानंतर घशातून ठसका बाहेर येतो, हे लक्षात घेऊन अशोकमामांनी या प्रकारे सतत ठसका देऊन बोलण्याची शैली या व्यक्तिरेखेला बहाल केली. एखादा बुद्धिमान अभिनेताच हे करू शकतो. एकीकडे 'हमीदाबाईची कोठी' सारख्या नाटकास थोर दिग्दर्शक विजया मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अप्रतिम भूमिका केली. त्याचबरोबर 'डार्लिंग डार्लिंग', 'सारखं छातीत दुखतंय', 'व्हॅक्युम क्लीनर' अशा नाटकांतून वेगवेगळी पात्रे साकारताना, रंगभूमीचा जिवंत अनुभव ते सतत घेत राहिले. 'छोटी घड़ी बातें', 'हम पाँच' यासारख्या दूरचित्रवाणी मालिकांतून घराघरांत पोहोचले. पन्नाशी उलटल्यानंतरही प्रचंड थकवणाच्या दूरचित्रवाणी माध्यमात जीव ओतून काम करणारा हा कलाकार, हे केवळ सचिन व महेश कोठारे यांच्या सिनेमांपुरते होते, असे समजण्याचे कारण नाही. 'खरा वारसदार' या चित्रपटात एक मानसिक रुग्ण हळूहळू सुधारत कसा जातो, याचे टप्पे त्यांनी परिणामकारकपणे दाखवले. सुरुवातीला कसाबसा तुटक बोलणारा तो वेडा पुढे आत्मविश्वास आल्यानंतर पूर्ण वाक्य नीटपणे कसा बोलतो, हेसुद्धा त्यांनी दाखवले. 'गुपचुप गुपचुप' या चित्रपटात कोकणी भाषेत आणि हेलात बोलणारा बावळट प्रोफेसर धोंड त्यांनी सुरेखपणे साकाराला, 'चौकट राजा' मधील गण्याच्या व्यक्तिरेखेतील हळवी बाजू किंवा 'कळत नकळत 'मध्ये लहान मुलीचा रुसवा गाणे म्हणून काढणारा मामा अथवा 'एक उनाड दिवस' या चित्रपटातील करारी स्वभावाचा उद्योगपती, व्यक्तिरेखेला पूर्ण न्याय कसा द्यायचा, हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. बेटी नंबर बन, कोयना, जोरू का गुलाम, येस बॉस, करण-अर्जुन, सिंघम यासारख्या हिंदी चित्रपटांतदेखील त्यांनी ठसा उमटवला. 'सिंघम'मधील हेड कॉनटेबल सावरकर दोन-चार प्रसंगांतही भाव खाऊन जातो. शाहरुखबरोबर काम करतानाही त्यांना आनंद मिळाला; मात्र अलीकडे चांगल्या संहिता मिळत नाहीत, अशी खंतही ते व्यक्त करत असतात. अनेक कलावंत काही अर्धेच टिकतात आणि नंतर कालबाह्य होतात. अशोक सराफ यांनी 1970 पासून चित्रपटांत काम करण्यास सुरुवात केली आणि अजूनही त्यांना भूमिका मिळत आहेत. 1960 च्या दशकापासून रंगभूमीवर पदार्पण करणारा हा अभिनेता अद्याप नाटकांत काम करत आहे. विनोदी, गंभीर असे सर्व प्रकारचे चित्रपट आणि विविध प्रकारच्या भूमिका करणारा हा अभिनेता नवीन काळाशी सांधा जोडत राहिला आहे. खऱ्या आयुष्यात अत्यंत गंभीर स्वभावाचा, नाती जपणारा आणि कमालीचा संवेदनशील असा हा माणूस या बहुरंगी आणि बहुरूपी अभिनेत्याचा बऱ्याच उशिरा, पण उचित गौरव झाला आहे.






# संकल्प विकसित भारताचा

डॉ. शैलेंद्र देवळाणकर
उच्च शिक्षण संचालक,
महाराष्ट्र राज्य

***पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने स्वातंत्र्याच्या अमृतकाळामध्ये 'विकसित भारत' बनवण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून त्यादृष्टीने धोरणात्मक पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी नुकताच सादर केलेला अंतरीम अर्थसंकल्प हा या प्रक्रियेतील पहिले पाऊल म्हणावे लागेल. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने पहिल्यांदाच आगामी २५ वर्षांतला भारत कसा असेल हे उद्दिष्ट ठेवून प्लॅनिंग केलेले आहे. चीन, अमेरिका यांसारख्या देशांप्रमाणे भारतामध्ये अशा स्वरुपाचे दीर्घकालीन आर्थिक नियोजन यापूर्वी कधीच घडलेले नाही. त्यामुळेच या अर्थसंकल्पाकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे.***

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी संसदेत सादर केलेलाअंतरीम अर्थसंकल्प हा पूर्णपणे विकसित भारताचे उद्दिष्ट साधणारा आहे. या अर्थसंकल्पाचा पायाच मुळात केंद्र सरकारने उद्दिष्ट ठेवलेल्या 'विकसित भारता'च्या संकल्पनेवर आधारलेला आहे. भारतीय स्वातंत्र्याचा अमृतकाम सध्या सुरू आहे. ७५ वर्षे पूर्ण करणारा प्रजासत्ताक भारत आता १०० व्या वर्षांकडे वाटचाल करत आहे. २०४७ मध्ये भारतीय स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा होणार आहे. पंच्याहत्तरी ते शंभरी या काळाला अमृतकाळ असे म्हटले जाते. या अमृतकाळामध्ये पुढील अडीच दशकासाठी भारताच्या कोणत्या विकास योजना असतील याचे प्रतिबिंध या अर्थसंकल्पात पडलेले दिसले. भारताचे स्थित्यंतर हे विकसनशील भारताकडून विकसित भारत असे करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे. या दृष्टिकोनातून केल्या जाणाऱ्या धोरणात्मक आखणीला पूरक असा हा अर्थसंकल्प आहे. त्यादिशेने पडलेले पहिले पाऊल म्हणून याकडे पाहता येईल.

'विकसित भारत' बनण्यासाठीची पूर्वअट आत्मनिर्भरता आहे.भारत सुरुवातीला आत्मनिर्भर बनेल आणि नंतर विकसित बनेल. त्याअनुषंगाने विचार करता भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठीची आर्थिक रणनीती या अर्थसंकल्पातून मांडलेली दिसते. एक महत्त्वाची बाब म्हणजे, स्वातंत्र्योत्तर काळात भारताने पहिल्यांदाच आगामी २५ वर्षांतला भारत कसा असेल हे उद्दिष्ट ठेवून प्लॅनिंग केलेले आहे. भारतामध्ये अशा स्वरुपाचे



दीर्घकालीन आर्थिक नियोजन यापूर्वी कधीच घडलेले नाही. अशा प्रकारचे नियोजन विकसित देशात नेहमी होत असते. चीनचे उदाहरण घेतल्यास, २०४९ पर्यंत चीन कसा असेल याचा कृती आराखडा २012 मध्येच तयार करण्यात आला होता आणि त्यातील टप्प्यांनुसार चीन पुढे जात राहिला. अमेरिकेमध्ये दर २० वर्षांनी नॅशनल डेव्हलपमेंट प्लॅन बनवले जातात आणि तशा प्रकारची नॅशनल स्ट्रॅटेजी बनवली जाते. भारताकडे अशा प्रकारच्या दीर्घकालीन योजनांचा अभाव होता. आता भारताने पहिल्यांदाच अमृतकाळामधील २०४७ पर्यंतची योजना बनवलेली आहे.

आत्मनिर्भर भारत बनण्यातील प्रमुख उद्दिष्ट हे रोजगार निर्मितीचे आहे.त्यानुसार भारताला मॅन्युफॅक्चरींग हब बनवण्याचा शासनाचा विचार आहे. यासाठी चार महत्त्वाचे भाग आहेत. यातील पहिला भाग म्हणजे साधन संपत्तीच्या विकासाचा आहे. त्यादृष्टीकोनातून मोठ्या प्रकारच्या तरतुदी या अंतरिम अर्थसंकल्पात केलेल्या आहेत. दुसरा भाग आहे तो म्हणजे स्कील डेव्हलपमेंट अर्थात कौशल्य विकास. उत्पादनक्षेत्रात आमूलाग्र क्रांती घडवून आणण्यासाठी कौशल्यप्रधान मनुष्यबळाची आवश्यकता असते. आज भारताची सर्वांत मोठी ताकद ही युवाशक्ती आहे. जगातील सर्वाधिक तरुणांचा देश म्हणून भारत पुढे आला आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पाचा मुख्य भर आहे तो कौशल्य विकासावर आहे. त्यादृष्टीकोनातून शिक्षणावर अधिक भर देण्यात आलेला आहे. निर्मला सितारामन यांनी अर्थसंकल्प मांडताना शैक्षणिक धोरण 2020चा जाणीवपूर्वक उल्लेख केलेला आहे. या धोरणांतर्गत कौशल्यावर आधारित शिक्षण हे युवकांना दिले जाणार आहे. यामाध्यमातून उद्योगजगताला आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ पुरवले जाणार आहे. त्यादृष्टीने या अर्थसंकल्पाचा भर हा प्रामुख्याने कौशल्य आधारित शिक्षणावर आहे. तिसरा भाग आहे तो नागरिकांचे आरोग्य. सद्यस्थितीत भारताचे चित्रपाहता, देशातील चार जणांच्या एका कुटुंबामध्ये सरासरी एक तरी व्यक्ती आजारी असते. याचाचअर्थ देशातील जवळपास १/४ लोकसंख्येला काही आजार जडलेले असल्याने त्याचा उपयोग उत्पादन क्षमतेसाठी होऊ शकत नाही. त्यामुळे आरोग्य सुधारणेवर देखील या अर्थसंकल्पात भर दिला गेला आहे. याखेरीज या अर्थसंकल्पातून महिला सक्षमीकरणावरही मोठ्या प्रमाणात भर दिला गेला आहे. गेल्या काही वर्षांत महिलांचे उच्चशिक्षणामधील प्रमाण वाढत आहे. गेल्या १0 वर्षांमध्ये ते २८ टक्क्यांनी वाढलेले आहे, ही एक जमेची बाजू आहे. आज आपल्याकडे ६५ कोटींच्या आसपास तरुणाई आहे. यापैकी ५0 टक्के महिला आहेत. त्यामुळे पुढचे विकसितभारताचे जे नेतृत्व असेल ते प्रामुख्याने महिलांच्या हातात असणार आहे. या दृष्टीकोणातून महिलांच्या सक्षमीकरणावर भर देणारा हा अर्थसंकल्प आहे.

याखेरीज चौथा मुद्दा म्हणजे भारताला आत्मनिर्भरता ही संरक्षण क्षेत्रामध्येही मिळवावी लागणार आहे. त्यासाठी देशात विदेशी गुंतवणूक कशी वाढेल या दृष्टीकोनातून देखील प्रयत्न या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे. एकंदरीत दीर्घकालीन उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठीची पायाभरणी या अर्थसंकल्पातून केल्याचे दिसते. त्यादृष्टीने पुढील २५ वर्षांमध्ये उच्चशिक्षणावर अधिक भर देण्यात येणार आहे. हे मॉडेल जपानसारख्या देशाने वापरलेले आहे. जपान हा दुसऱ्या महायुद्धामध्ये हा उद्ध्वस्त झालेला देश होता. १९७0 च्या दशकामध्ये दोन नंबरची अर्थव्यवस्था बनला. याचे कारण जपानने मनुष्यबळ विकासावर म्हणजेच ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंटवर सर्वाधिक भर दिला. यासाठी युवकांमध्ये कौशल्य विकसित करण्यासाठी अनेक योजना राबवल्या. तशाच प्रकारे आज भारताचा मुख्य फोकस युवाशक्ती आहे. यावरच विकसित भारताची संकल्पना आधारित

असल्यामुळे तरुणपिढी कौशल्यवान, प्रतिभासंपन्न बनलण्यासाठी शिक्षणाचा गुणात्मक आणि संख्यात्मक दोन्ही प्रकारचा विस्तार हा भविष्यात केला जाणार आहे. १८ ते २३ वयोगटातील उच्च शिक्षणाची संख्या वाढावी यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. शिक्षणामधील ४0 टक्के भाग कौशल्य विकसनावर असणार आहे. यादृष्टीकोनातून आवश्यक अशा तरतुदी अर्थसंकल्पात केलेल्या आहेत.




# जननायकाचा सन्मान

मागासवर्गीयांना त्यांचे हक्काचे प्रतिनिधित्व आणि संधी मिळाव्यात, यासाठी ऐतिहासिक भूमिका बजावणा-या जनगणक कर्पूरी ठाकूर यांना मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान मिळाल्यामुळे देशवासीयांना आनंद होणे स्वाभाविक आहे. आपले संपूर्ण जीवन शोषित आणि वंचित्तांसाठी समर्पित करणारा नेता. विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतच शिक्षण मिळाले पाहिजे, या विचाराचा त्यांनी सदैव पुरस्कार केला. स्वातंत्र्योत्तर काळानंतरही अनेक दशके देशातील करोडो दीनदलित, मागासवर्गीयांना मूलभूत सुविधाही मिळाल्या नव्हत्या, या समाजाचा उद्धार करण्याचे कार्य कर्पूरी यांनी केले. कर्पूरी हे बिहारच्या ओबीसी राजकारणातील एक सर्वात महत्त्वाचे नाव. 24 जानेवारी 2024 या त्यांच्या जन्मशताब्दी दिनाच्या उंबरठ्यावर हा पुरस्कार जाहीर होणे, हे समयोचित मानावे लागेल. कर्पूरी यांनी कॉलेज सोडून स्वातंत्र्य आंदोलनात उडी घेतली आणि 'छोडो भारत' चळवळीत त्यांना अटक झाली. ते तीन वर्षे तुरुंगात होते. कर्पूरी यांच्या जीवनावर महात्मा गांधी यांचा प्रभाव होता. स्वातंत्र्याच्या आंदोलनात एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, मधू लिमये, मधू दंडवते असे अनेक नेते उतरले होते. स्वातंत्र्यानंतर कर्पूरी यांनी आपल्याच खेड्यातील शाळेत शिक्षक म्हणून काम करण्यास सुरुवात केली, गांधीजी आणि विनोबा भावे यांच्या शिक्षणविषयक विचारांच्या दिशेने ते वाटचाल करु लागले. 1952 च्या बिहार विधानसभा निवडणुकीत कर्पूरी समाजवादी पक्षाचे उमेदवार म्हणून निवडून आले. त्याचवेळी टपाल कर्मचारी आणि अन्य कामगारांचे अनेक लढे त्यांनी उभे केले आणि त्यासाठी प्रदीर्घ उपोषणेही केली. समाजवाद्यांवर राममनोहर लोहिया यांचा प्रभाव असल्यामुळे कर्पूरी यांनीही हिंदी भाषेचा पुरस्कार केला, लोहिया यांच्या गैरकाँग्रेसवादी राजकारणाचा परिपाक म्हणून जेव्हा काही राज्यांत संयुक्त विधायक दलाची सरकारे आली, त्यात बिहारचाही समावेश होता. त्या सरकारमध्ये ते प्रथम मंत्री आणि नंतर उपमुख्यमंत्री बनले आणि 1970 साली ते बिहारचे पहिले बिगरकाँग्रेस मुख्यमंत्री ठरले. त्यावेळी प्रथमच त्यांनी बिहारमध्ये दारूबंदी आणली. बिहारच्या मागास भागांत अनेक शाळा आणि महाविद्यालये स्थापन केली. आरक्षणासाठी कर्पूरी यांनी अनेक आंदोलने केली आणि त्यामुळे बिहारमधील दलित, ओवीसी आणि अतिमागासवर्गीयांमध्ये आत्मविश्वासाची भावना निर्माण झाली. तो काळ सरंजामशाही वर्चस्वाचा आणि दहशतीचा होता. जमिनीच्या मालकीची नोंद असलेले रेकॉर्डच सरकारजवळ नव्हते. जमीनदारी प्रथा कायद्याने संपवण्यात आली होती, तरीही कुळांच्या नोंदी मात्र जमीनदारांकडून शासनाकडे सुपूर्दच करण्यात आलेल्या नव्हत्या. उच्च जातींच्या जमीनदारांकडे दहा-दहा हजार एकरांची जमीन होती. बिहारची सारी आर्थिक, सामाजिक व राजकीय सूत्रे या वर्गाकडे होती. जमीनदारांनी सारावसुलीसाठी आणि

आपापल्या जमिनींच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी खासगी सैन्ये उभी केली होती. मुस्लिम तसेच यादव, कूर्मी, कोयरी वगैरे मागास व अतिमागास जातीच्या लोकांना त्यांनी गुलाम म्हणून वागवले होते. निवडणुकांमध्ये बूथ ताब्यात घेऊन, हव्या त्या पद्धतीने मतदान करून घेतले जात होते.

अशा या सामाजिक अंधारात नाभिक समाजातील कर्पूरी हे सत्तेत आले आणि अखिल मागास जातींचे नेते बनले. जयप्रकाश नारायण यांचेही ते लाडके शिष्य होते आणि आणीबाणीत संपूर्ण क्रांती लढयात त्यांनी झोकून दिले होते. इंदिरा गाधी यांचा पराभव करून जनता पक्ष सत्तेवर आल्यावर, बिहारमध्येही जनता पक्षाची सत्ता आली. पूर्वीच्या संघटना काँग्रेसचे नेते सत्यनारायण सिन्हा तेव्हा बिहार जनता पक्षाचे अध्यक्ष बनले होते, त्यांच्या विरोधात कर्पूरी विधिमंडळ पक्षनेतेपदाच्या निवडणुकीत जिंकले आणि पुन्हा बिहारचे मुख्यमंत्री बनले. सरकारी नोकऱ्यांमध्ये प्रागास जातीसाठी आरक्षण असावे, असा अहवाल मुंगेरीलाल आयोगाने दिला होता. तो राबवण्याचा निर्णय कर्पूरी यांनी घेताच पक्षातील उच्च जातीय आमदारांनी त्यास विरोध केला, तेव्हा त्यांनी राजीनामा दिला. 1979 साली जनता पक्ष फुटला, तेव्हा त्यांनी चौधरी चरणसिंग यांना साथ दिली आणि 1980 च्या विधानसभा निवडणुकीत ते 'जनता पक्ष सेक्युलर' चे उमेदवार म्हणून निवडून आले. मात्र, कर्पूरी यांची आठवण राहील, ती 1978 साली मुख्यमंत्री असताना त्यांनी आरक्षणाचे जे मॉडेल तयार केले होते, त्यासाठी. या आरक्षणात ओबीसींना 12 टक्के, अतिमागासांना 8 टक्के, स्त्रियांसाठी 3 टक्के आणि उच्च जातीतील आर्थिकदृष्ट्या मागासांना 3 टक्के असे आरक्षण सरकारी नोकऱ्यांमध्ये ठेवण्यात आले होते. जेव्हा मंडल अहवालही आला नव्हता, त्याआधी आरक्षण धोरणाचा असा सखोल व व्यापक विचार करणारा नेता म्हणून त्यांची कामगिरी लक्षणीय मानावी लागेल. त्यांनी लालूप्रसाद यादव, नितीशकुमार, रामविलास पासवान, देवेंद्रप्रसाद यादव अशा अनेकांना घडवले. संयुक्त सोशलिस्ट पार्टीचे अध्यक्ष म्हणून समाजवाद्यांची ताकद वाढवण्याचे त्यांनी तळमळीने प्रयत्न केले. त्यांनी निवडणुकांत नेत्यांच्या मुलांना तिकिटे देण्यास नेहमीच विरोध केला. राजकारणात घराणेशाही असता कामा नये, असे त्यांचे ठाम मत होते. बिहारमध्ये आगडे विरुद्ध मागास असे जातियुद्ध सुरू असताना, मागासांना राजकीयदृष्ट्या संघटित व जागरूक करण्याचे काम त्यांनी केले. त्यांचे चारित्र्य अत्यंत स्वच्छ होते आणि राहणी अतिशय साधी होती. खासदार असताना एका शिष्टमंडळात ते युगोस्लाव्हियात गेले असताना, तेथील थंडीतही ते कुर्ता आणि धोतीमध्येच वावरले होते. त्यावेळचे युगोस्लाव्हियाचे साम्यवादी अध्यक्ष जोसिप टिटो हेदेखील त्यांना भेटून प्रभावित झाले होते. त्यांनी कर्पूरींना भेट म्हणून एक कोट दिला. युगोस्लाव्हियाहून पाटण्याला परत आल्यानंतर त्यांनी तो कोट आपल्या एका सहकाऱ्यास भेट देऊन टाकला. पैसा आणि संपत्ती यांचे कोणतेही आकर्षण नसलेले आणि समाजातील 'नाहीरे' वर्गासाठी अवघे आयुष्य वाहणारे कर्पूरी ठाकूर यांच्यासारखे जननायक खूप दुर्मीळ झाले आहेत. उशीर झाला, पण मोदी सरकारने त्यांचा उचित सन्मान केला आहे.

## ‘मॅक’ची वार्षिक सभासद वर्गणी मिळणे बाबत

महोदय,

‘मॅक’च्या सभासद बंधू-भगिनींना विनंती करण्यात येते की, ज्या सभासदांची **वार्षिक सभासद वर्गणी** संस्थेकडे जमा करावयाची राहिलेली आहे अशा सभासदांनी **दि.३१ मार्च २०२४ पूर्वी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल-हातकणंगले** या नावाने चेक काढून संस्थेमध्ये जमा करून संस्थेस सहकार्य करावे ही नम्र विनंती.

कळावे,

आपले विश्वासू,

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री. सुरेश क्षीरसागर** | **विठ्ठल पाटील** | **श्री. मोहन कुशिरे** | **श्री. हरिश्चंद्र धोत्रे** |
| ऑन. ट्रेझरर | ऑन. सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |




अर्थनीती

# समतोल अर्थसंकल्प

चार दिवसांपूर्वीच केंद्रीय अर्थ मंत्रालयाने 'भारतीय अर्थव्यवस्था एक अवलोकन' नावाचे टिपण प्रसिद्ध केले होते. त्यामध्ये येत्या तीन वर्षात भारतीय अर्थव्यवस्था 5 ट्रिलियन डॉलरवर जाईल, असा आत्मविश्वास व्यक्त करण्यात आला होता. गेल्या तीन वर्षांत भारताने 7 टक्क्यांहून अधिक गतीने आर्थिक विकास साध्य केला आणि 2024-25 मध्येही तो अधिक गतीने साधला जाईल, असेही त्यात नमूद करण्यात आले होते. बुधवारी संसदेच्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांना उद्देशून केलेल्या भाषणात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पंतप्रधानांचा विकासाचा दृष्टिकोन अधोरेखित केला होता. विकसित भारताची इमारत युवा, महिला, शेतकरी आणि गरीब या चार स्तंभांच्या आधारावर उभी असेल, असे मत मुर्मू यांनी व्यक्त केले होते. जगभरात भारताच्या अर्थव्यवस्थेची गणना 'टॉप 'फाईव्ह' मध्ये होऊ लागली आहे. 'मेड इन इंडिया' हा आता ब्रँड बनला आहे. 'आत्मनिर्भर भारत'चे जगभर कौतुक होऊ लागले आहे. भारतात डिजिटल क्रांती घडून आली आहे. ऑनलाईन अर्थव्यवहारांचे प्रमाण जगाच्या 46 टक्के असून, 'यूपीआय' च्या माध्यमातून कोट्यवधींचे आर्थिक व्यवहार होत आहेत. शिवाय, 25 कोटी जनतेला गरिबीतून मुक्त केल्याचा केंद्र सरकारचा दावा आहे. या सर्व पार्श्वभूमीवर, मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातील अखेरचा अर्थसंकल्प ठरणारे लेखानुदान गुरुवारी मांडण्यात आले. आगामी लोकसभा निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून, या अंतरिम अर्थसंकल्पात घोषणांची उधळण होईल, तसेच प्राप्तिकरदात्यांना सवलतीही घोषित केल्या जातील, असे अंदाज व्यक्त केले जात होते. परंतु, प्रत्यक्षात तसे काहीही घडलेले नाही. लोकसभा निवडणुका नजरेसमोर असल्या, तरीही केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकानुनयी धोरण स्वीकारले नाही, हे कौतुकास्पद म्हणावे लागेल. 2019 च्या आधी कर्नाटक, छत्तीसगड, राजस्थान, मध्य प्रदेश या राज्यांमधील विधानसभा निवडणुकांत कॉंग्रेसला यश मिळालेले होते. अशावेळी लोकसभा निवडणुकीत यश मिळेल, अशी भाजपलाही पूर्ण खात्री नव्हती. यावेळी मात्र राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांतील विधानसभा निवडणुकांत भाजपला दणदणीत यश मिळाले. तो आत्मविश्वास या अंतरिम अर्थसंकल्पात झळकतो आहे. लोकसभा निवडणुका पुन्हा जिंकण्याची खात्री भाजपला वाटते. ती जिंकण्यासाठी काही 'गिमिक्स' करण्याची गरजच नव्हती, असा संदेश अर्थसंकल्पातून देण्याचा प्रयत्न झाला आहे. कोरोना महामारीचे संकट असतानाही केंद्रीय अर्थमंत्र्यांनी सावधपणे पाऊल टाकले होते. अनेक अर्थतज्ज्ञांनी, राज्य सरकारांनी प्रमाणाबाहेर खर्च करून लोकांना मदत करावी, अशी सूचना केली होती. केंद्राने




गोरगरिबांना तसेच स्थलांतरित मजुरांना मोठ्या प्रमाणावर मदत केली. परंतु, त्याचवेळी सरकारच्या तिजोरीत किती पैसा आहे, याचा विचार करुनच खर्च केला. या कारणाने वित्तीय तूट प्रमाणाबाहेर वाढली नाही.

चालू वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत वित्तीय तूट वार्षिक अंदाजाच्या 55 टक्क्यांवर आहे. 2023-24 या संपूर्ण आर्थिक वर्षासाठी वित्तीय तूट सुमारे 17 लाख कोटी रुपये; अर्थात सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या किंवा जीडीपीच्या तुलनेत 5.1 टक्के मर्यादित दाखवली जाणे अपेक्षित आहे आणि ही तूट मर्यादित राहील, अशीच चिन्हे आहेत. वित्तीय तूट 5.1 टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. आणखी महत्त्वाचे म्हणजे, गेल्या दहा वर्षात प्राप्तिकर संकलनात तीन पट वाढ झाली. करचनेत आणलेली सुसूत्रता आणि करवसुलीची यंत्रणा बळकट करणे, यामुळे हे साध्य झाले. मात्र, सध्या प्राप्तिकर भरणाऱ्यांना कोणताही दिलासा मिळालेला नाही. करसुटीची मर्यादा सात लाखांवरून आठ लाख रुपयांवर जावी, अशी अपेक्षा व्यक्त होत होती. देशातील महागाईचे प्रमाण वाढले असून, ते तरी नियंत्रणात आणले जावे, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. महागाई माफक आहे, हे अर्थमंत्र्यांचे म्हणणे गृहिणींना स्वीकारार्ह असेल, असे वाटत नाही. रेल्वे, रस्ते या पायाभूत सोयी उभारण्यावर भर दिला जाईल, हे अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले. 40 हजार रेल्वे बोगीचे 'वंदे भारत' दर्जात रुपांतर करण्यात येणार असून, मेट्रोचे जाळेही वाढवले जाणार आहे. तसेच 149 नवीन विमानतळ उभारले जाणार आहेत. वाढत्या शहरीकरणाची आव्हाने पेलण्यासाठी ही गोष्ट गरजेचीच होती. देशात 7 नवीन आयआयएम स्थापन करणे, वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या वाढवणे, संशोधन व विकास या क्षेत्रात नवीन उद्योग यावेत यासाठी व्याजमुक्त अर्थसाहाय्य देणे, या घोषणा तरुणांना आकर्षक वाटू शकतात. तसेच 'लखपती दीदी' योजनेचा आवाका दोन कोटींवरुन तीन कोटींपर्यंत वाढवला जाणार आहे. या योजनेमुळे महिला स्वावलंबी होत आहेत, हे वास्तव आहे. 1 ते 14 वर्षे वयोगटातील मुलींसाठी मोफत लसीकरण केले जाणार असून, यायोगे गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग रोखण्यासाठी पावले उचलली जाणार आहेत, सीतारामन यांनी आपल्या प्रत्येक अर्थसंकल्पात स्त्रियांच्या आरोग्याचा व विकासाचा विचार केला आहे, हे नोंदवले पाहिजे. देशात लवकरच 'आत्मनिर्भर तेलबिया अभियान' सुरु केले जाणार असून, मोहरी, तीळ, सूर्यफूल, शेंगदाणा, सोयाबीन या तेलबियांचे देशांतर्गत उत्पादन वाढवण्यात येणार आहे. राजीव गांधी यांनी पंतप्रधान असताना तेलबियांचे उत्पादन वाढवण्यासाठी एक मिशनच स्थापन केले होते. दुग्धोत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी सर्वंकष योजना आणण्यामुळे शेतकऱ्यांच्या जोड उत्पन्नात भर पडू शकते. 2014 पूर्वी भारत आर्थिक क्षेत्रात कुठे होता आणि आपण आता कुठे आहोत, याची तुलना करण्याचा मोह अर्थमंत्र्यांना टाळता आलेला नाही. अगोदरच्या काळात किती गैरकारभार झाला, हे पाहून त्यामधून धडा घेण्याची गरज आहे आणि त्याकरिताच आम्ही श्वेतपत्रिका सादर करणार आहोत, अशी घोषणाही श्रीमती सीतारामन यांनी करून टाकली आहे. वास्तविक, आजतागायत कोणत्याही श्वेतपत्रिकेतून राजकारणापलीकडे काहीही साध्य झालेले नाही, हे लक्षात घ्यावे लागेल. परंतु, निवडणुका तोंडावर असल्यामुळे अर्थसंकल्प अळणी वाटू नये, म्हणून थोडेसे तिखट-मीठ यांचा शिडकावा करणे त्यांना आवश्यक वाटले असावे!

# 365 DAYS ROHITRA



**CONNECT FOR QUALITY AND RELIABILITY!**



BIS 1180 approved transformers.
Rating up to 2500 kVA / 11 kV, 22kV, 33kV
and extended capacity up to 10 MVA.

■ Mineral Oil Filled Distribution Transformers ■ Ester Oil Filled Distribution Transformers ■ Isolation Transformers ■ Arc / Induction Furnace Transformers ■ Multi-Winding Transformers ■ Solar / Windmill applications Transformers ■ Corrugated Tank Transformers ■ Hermetically Sealed Maintenance-free Transformers ■ Transformers with On Load Tap Changer (OLTC)

Office: Pune, Maharashtra, India. **T. +91 20 48618683, M. +91 7219617700**
Works : Sanaswadi, Dist. Pune, Maharashtra, India. **M. +91 7219131053**

ROHITRA
INDIA PRIVATE LIMITED
*Power to you...!*

**www.rohitraindia.com**
**info@rohitraindia.com**

# MULTI SALES CORPORATION

KOLHAPUR Mob No. 9423042574, 8329543753

E-Mail : multi_sales@rediffmail.com, multisalescorpoartion@gmail.com

Relation Beyond Service




ONE ROOF SALES AND SERVICE FOR ALUMINIUM FOUNDRY

1. Distributor for SKR Engineering (Furnaces) and Alucast Machines (GDC Machine) for Maharashtra
2. Channel Partner & Authorised Distributor for Foseco India Ltd. (Non Ferrous Products)
3. We also supply - Temperature Controller, L Shape Thermocouple, Furnace Coils & Spares, Gas Burners, Transfer Ladles, S. S. Shots, Aluminium Repairing Kit, Ceramic Blanket, THERMOL Fuel Additive, Bendsaw machine & Belt Sander

**Corporate Office :** 51, Shivaji Housing Society, 12th Lane Rajarampuri, KOLHAPUR - 416008. Ph. No. 8446523916

**Works / Godown :** C-3/19, Five Star MIDC Kagal- Hatkangale, KOLHAPUR - 416236. Ph. No. 9156764135, 9422074235



BAKERS PRIDE®

KONARK

OVENS & BAKERY MACHINES

**Manufactures of Bakery Ovens & Machines, Industrial Furnace, Ovens & Heat Treatment Machines**

H/O & Factory - Plot No. H-15 , 5 Star M.I.D.C , Kagal, Kolhapur- 416 236


www.konarkbakerymachines.com

## MANUFACTURING OF SERVO STABILIZER
## AIR COOLED,OIL COOLED AND STATIC. 1PHASE AND 3 PHASE



**MICROTECH**
*Your Trusted Partner*

## CONTROL PANELS



**AUTHORISED CHANNEL PARTNERS**

DELTA
CNC Solutions & Industrial Automation Product

INOVANCE
Automation Product

invt
Automation Product

## MANUFACTURING ROUGHING CNC LATHE MACHINE & SLANT BED CNC LATHE MACHINE



**SOLUTION FOR AUTOMATION IN MACHINE TOOL**

Retrofitting and Resale of USED CNC Machines,
System Integrator for DELTA and INOVANCE.


Unit -2



**MANUFACTURING DIVISION FOR ALL TYPES OF**

Electrical Control Panels, Water Solution Pump Panel,
Industrial Servo Stabilizer And Isolation Transformers.

Unit -1



**Ph.: 0231 2305251**
**Cell : 93733 86677**
**93733 86622**
www.microtech-automation.com

Unit -1 A-30, Kagal Hatkanangale 5 Star MIDC, Kolhapur, 416216.
Unit -2 Opp. Mayur Petrol Pump, Gokul Shirgaon MIDC, Kolhapur, 416216.
Branch Office - Plot No. Laxmi Building ,Opp. Manickbag ,Khanapur Road ,Udyambag , Belgaum -590008


MANUFACTURER OF ROOFING, LINER & TILE PROFILE
GHATAGE ROOFINGS PVT. LTD.
AN ISO 9001:2015 CERTIFIED COMPANY
MAKE IN INDIA
High Quality
Gauge Checking Facility
Available in All Colours
Available As Per Demand & Size
Accessories Available
CUSTOMISED COLOUR COATED ROOFING SHEETS MANUFACTURER
Factory: G-50, Kagal-Hatkanangale Five Star MIDC, Kolhapur, Maharashtra - 416203
E-Mail: ghatageroofings@gmail.com | Mobile: +91-9699797907, 9604265265


CMM Measurement & Inspection Services
ZEISS SPECTRUM 500X500X500
HEXAGON GLOBAL 1200X1000X900
MONARK
DUCTILE IRON CASTING PVT. LTD.
C 1/6, Five star MIDC Kagal, Kolhapur- 416236
Email ID : monarkductile@gmail.com
Call: 9975241896, 9225839991, 9011484008

# Advik Engineers

Transforming Ideas into Reality.



Cold Box Core Shooter Universal Parting Line



Cold Box Core Shooter Vertical Parting Line



Shell Core Shooter Vertical Parting Line



Cold Box Core Shooter Horizontal Parting Line

- Cold Box Core Shooters
- Shell Core Shooter
- Dump Bok Type Shell Moulding Machine
- Sand Conveying Systems
- Auto Sand Mixer With Auto Dosing (Cold Box)
- All Type Of Fabrication Works

Address : D-18 Kagal-Hatkanangale, Five Star MIDC Kagal.
Mob.: +91 8208232522 +91 9130592592

E-mail : info@advikengineers.com
Website : www.advikengineers.com

## Pre Engineered Buildings (PEB) Applications

| | | |
|---|---|---|
| Industrial Sheds | Cold Stores | Office Cabins |
| Warehouses | Godown | Car Parking |
| Workshops | Showrooms | Farm House |
| Factories | Exhibition Hall | Project Office Cabins |

## Proud to be associated with

Presently M and K Group is extending manufacturing support to following leading global companies for their international projects in Middle East and Europe

Thermax ThyssenKruup L&T Infra NPCIL

## Why Choose Us?

### State of the Art Manufacturing :

The factory is spread across 8 acres land with the annual production capacity of 60,000 MT. The plant is quintessentially well equipped with high precision CNC machines to fabricate and supply quality steel buildings

### Skilled Manpower :

Currently our team comprise of 250 certified, highly skilled and experienced professionals. We provide handsome opportunities to our team to showcase their talent and upscale them regularly.

### Expertise in Designing and Detailing :

Manufacturing of pre-engineered buildings requires creative approach and high precision. Our design and engineering team uses latest software for all PEB designs

### In time Project Completion :

We ensure that we keep our commitments. Every project is completed as per customers' timelines. We are proud to state that till date we have zero complaints w.r.t timelines

## Our Happy Customers

www.mandkpeb.in

M and K Building Systems Pvt. Ltd.

"Sustainable Steel Building Solutions"

9975 977994 mandkpebdesigns@gmail.com

A 85,Kagal-Hatkanangale Five Star MIDC Kolhapur (HAH) 416216

www.mandkpeb.in

# Pre-Engineered Buildings (PEB) Manufacturer

M and K Building Systems Pvt. Ltd.
"Sustainable Steel Building Solutions"

Expandable,
Cost Effective,
Flexible,
Durable,
Energy Efficient
World Class Architectural Designs

Projects Executed By Us



D-Mart, Nimshirgaon

| 18+ | 1140+ | 100% | 3+ States 11+ Districts |
|---|---|---|---|
| Years of Experience | Projects Completed | Repeat Customers | Our Presence |

## M and K Advantage

"We are one of the leading PEB Manufacturers & Erectors in South Western Maharashtra and Uttar Karnataka."

"We also assist customers for getting, approval of Industrial Corporation / town planning, government subsidy schemes and bank finance"

## Why select Pre-Engineered Buildings (PEB)?

- 100% Off-Site Factory Production
- Low Maintenance
- Quick Assembly On-Site
- Expandable
- Minimized Site Disturbance
- Flexible and Versatile
- Cost Effective
- Energy Efficient

**Go Green with Pre Engineered Buildings. They are Easy to Relocate and Recycle**

Micrometal Foundry



Pioneer



Classic Gipsm



Tushar Industries




ISO 9001:2015
LOAD LIFT
BEST QUALITY at
LOWEST OFFER
IS GUARANTEE
SIMRAN
TECHNOLOGY
Vikrant Kudale
+91 9845407235
Eot Single Girder Crane
Eot Double Girder Crane
Weigh Bridge
Hydraulic Hand Pallet
Chain Pully Block
Electric Chain Hoist
Electric Wire Rope Hoist
Platform Scale
Goods Lift
Hanging Scale
High Accuracy Electronic Weighing Scale
Electric Mini Crane
Hydraulic Stakcers
Wire Rope Hoist
Motorised End Carrage
Wire Rope Double Gurder Crab
Heavy Industrial Crane (EOT)
Industrial Zip Crane
OFFICE
Office : 2009/1A,
1st Floor Bilgi Jewellers,
Ganapat Galli, Belgaum
FACTORY
Work : Plot No. B13,
IT Park, KSSIDC Industrial
Area, Desur, Belgaum
W: www.simrantechnology.com E: simrankudale@gmail.com




BSUK
Since 1987
Kolhapur | Mumbai | Goa

MAKE IN INDIA
Business Service Unit of Kolhapur

SafeSeal®
Simply Packaging

**SAFESEAL**
**MACHINES PVT. LTD.**

## आमच्या असंख्य ग्राहकांसाठीचं

## ऑटो पॅकेजिंग व बॅच कोडींग

## अभ्यासपूर्वक अद्यावत मशिनची मालिका.. कोल्हापूरातून..!

**मुख्य कार्यालय:** जी 135. एम.आय.डी.सी. टेलिफोन ऑफिस जवळ, गोकुळ शिरगांव, कोल्हापूर- 416234

9371672126, 9321202112, 9371100659 (0231) 2672126 R
**शाखा नं.1 :** मुंबई 9322599203 (022) 22071783
**शाखा नं.2 :** गोवा 9371172126 (0832) 2252290

**फॅक्टरी:** D-56/२, कागल-हातकणंगले फाईव्ह स्टार, एम.आय.डी.सी., कोल्हापूर - 416 236

www.bsuk.in • bsuk99@yahoo.com • www.safeseal.in

**Balancing between running a smooth business and at the same time protecting it from unforseen factors is like sailing in a storm..**

We at Midas Investment Consultancy, understand this better as an investment partner... With our rich experience of 25 years, let us help you sail through these storms by securing your business assets and liabilities..

MIDAS
INVESTMENT CONSULTANCY

**Mrs. Savita Sagare**
**Cell: +91 98500 99477**
Shop No. 10, HR3 Building, Star Ashiayana,
Near Kolhapur Public School, Morewadi Naka,
Kolhapur. email: savitasagare@ymail.com

### OUR EXCLUSIVE INDUSTRIAL SERVICES

- Factory Insurance.
- Raw, Scrap & Finished Material and Machinery Insurance.
- Labour Insurance.
- Industrialist Income protection plans.
- Life & Health Insurance.
- Group Gratuity & Provident Fund Schemes.
- Import & Export Insurance.

LIC

The New India Assurance Co. Ltd

MakNet®




# One Step Ahead, Always... In Quality & Service



- Hydraulic Elevators
- Passenger Elevators
- Hospital Elevators
- Home Elevators
- Car Elevators
- MRL Elevators
- Gearless Elevators
- Bungalow Elevators
- Goods Elevators
- Service Elevators
- Capsule Elevators
- Escalators

## Excellent Product Range Supported By Excellent Service




MakNet®
INDUSTRIES PVT. LTD.

IAF

**Corporate office :**
3rd Fl, Bhaskar Plaza, Shahupuri, Kolhapur, India - 416 001
+91 231 2666221/24, 9326269314
mak1@maknet.co.in, mak2@maknet.co.in

Belagavi: +91 9326269314 I Vijapur: +91 9326269309
mak6@maknet.co.in
**www.maknet.co.in**